www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक **लोकरक्षणाय**

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ कल्याणात होणारे सुसज्ज आयसीए भवन शहरासाठी...
पान ३ वर....



■ रायगडला आदिती तटकरे तर नाशिकला गिरीश महाजन...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २२४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, मंगळवार, २१ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

# जंगलातील मध्यवर्ती भागामध्ये स्थानिक फळझाडे लावावीत - वनमंत्री गणेश नाईक

## वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाच्या विविध विषयांवर आढावा बैठक संपन्न

● ठाणे, रोहित जैसवार :

जंगलातील मध्यवर्ती भागामध्ये स्थानिक फळझाडे लावावीत. यामध्ये रायवली आंबा, बोर, जांभूळ या रोपांची लागवड करावी, बहाडोली जांभूळ (पालघर) तसेच आंबा कलम करून त्यांची रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करावीत. ही रोपे जंगलाच्या मध्यवर्ती भागात लावल्यामुळे जंगलातील मांसभक्षी प्राण्यांच्या भक्ष्यांची संख्या या भागात वाढून मनुष्य-वन्यजीव संघर्ष कमी होईल, अशा सूचना वनमंत्री गणेश नाईक वनाधिकाऱ्यांच्या बैठकीत दिल्या.

वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाच्या विविध विषयांवर आढावा घेण्याकरिता शुक्रवार, दि.१७ जानेवारी २०२५ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई येथे बैठक संपन्न झाली, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे अपर मुख्य सचिव (वने) श्री.मिलिंद म्हैसकर (भा.प्र.से.), प्रधान मुख्य वनसंरक्षक वनबल प्रमुख श्रीमती



शोमिता बिश्वास (भा.व.से.), प्रधान मुख्य वनसंरक्षक श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वनसंरक्षक श्री.संजीव गौर तसेच भारतीय वनसेवेतील इतर वरिष्ठ वनाधिकारी, क्षेत्रीय वनकर्मचारी वनविभागातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.या बैठकीत सर्व विभाग प्रमुखांनी वनमंत्री गणेश नाईक यांना प्रत्येक विभागाचा आढावा दिला. यामध्ये कॅम्पा, वन्यजीव, अर्थसंकल्प तरतूदी FCA, संरक्षण, कांदळवन कक्ष, सामाजिक वनीकरण, वनविकास महामंडळ इत्यादी विभागांचा समावेश होता.

# मराठी बंधु-भगिनींचे प्रेम अनमोल, मला या प्रेमातच राहायचे आहे! - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे इ्युरिक, स्वित्झर्लंड येथे बृहन महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडतर्फे नुकतेच स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वैश्विक मराठी परिवारातील आपल्या मराठी बंधु-भगिनींशी मनमोकळा संवाद साधला. बृह्न महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडच्या प्रेमाचे मोल नाही, मला या प्रेमातच राहायचे आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, आपला महाराष्ट्र भारताचे पॉवर हाऊस असून देश पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था झाल्यानंतर एक ते दोन वर्षांतच महाराष्ट्र पहिली उपराष्ट्रीय ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था होईल. एआय तंत्रज्ञानात आघाडी घेतलेला महाराष्ट्र भारताचे डेटा सेंटर कॅपिटल असल्याचे म्हणत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महाराष्ट्रात इनोव्हेशन सिटी तयार करणार असल्याचे सांगितले. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला देव, देश, धर्माकरता लढायला शिकवले, आपल्या संस्कृतीचा, भाषेचा अभिमान बाळगायला शिकवले, ती शिकवण मराठी माणसाने स्वित्झर्लंडमध्येही जपली आणि पुढच्या पिढीलाही दिली, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले.
पान २ वर

# शासकीय निवासी शाळेतील २३ विद्यार्थ्यांना विषबाधा



● सांगली, नितीन देवळेकर

सांगलीच्या विटा येथील शासकीय निवासी शाळेतल्या २३ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. रविवारी रात्रीच्या सुमारास मुलांना देण्यात आलेल्या जेवणातून ही विषबाधा झाल्याचं सांगण्यात येत आहे. आज सकाळपासून मुलांना मळमळ, जुलाब, पोटदुखी आणि अस्वस्थ वाटू लागल्यानंतर तातडीनं त्यांना विट्याच्या ग्रामीण रुग्णालयामध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आलं. या सगळ्या विद्यार्थ्यांची प्रकृती सध्या स्थिर आहे. समाजकल्याण विभागाच्या विटा येथील शासकीय निवासी शाळेमध्ये हा विषबाधेचा प्रकार घडला असून रात्री मुलांना मटणाचं जेवण देण्यात आलं होतं. त्यामुळं या जेवणातून विषबाधा झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. एकाचवेळी २३ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्यानं खळबळ उडाली आहे. विटा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी विशाल नलावडे म्हणाले, "सकाळी काही मुलांना त्रास होऊ लागल्यानं त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं.
पान २ वर

# ढाकणी (तुपेशेत) मंजूर बंधारा सुरू करणे बाबत शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

● सातारा, दिगंबर जाधव:

दहिवडी दिनांक दुष्काळी मान तालुक्यामध्ये दुष्काळ नाहीसा करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले आहेत. त्याचाच भाग म्हणून मृदू व जलसंधारण विभागाने२०२३ रोजी ढाकणी (तुपेशेत ) नवीन सिमेंट बंधारा कामाच्या कार्यारंभ आदेश दिला. परंतु, हे काम सुरू करण्यास शेजारील गावातील काही गावगुंडांनी विरोध केल्यामुळे प्रजासत्ताक दिनी दिनांक २६ जानेवारी रोजी दलित मातंग समाजातील शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. अशी



माहिती सातारा जिल्हा परिषद माजी सदस्य व मानवी हक्क अभियानाचे उपाध्यक्ष दिलीप रामचंद्र तुपे यांनी दिली आहे. ढाकणी (तुपेशेत) या ठिकाणी दलित समाजातील मातंगांसोबत धनगर मराठा वंजारी समाजाची शेत जमीन आहे. या शेत जमिनीला शेतीसाठी पाणी मिळावे यासाठी जलसंधारण विभागाने सिमेंट बंधारा मंजूर केला. कार्यारंभ आदेशानुसार बंधारा बांधण्यासाठी संबंधित ठेकेदारांनी यंत्रणा पाठवली होती. त्या ठिकाणी काही गावगुंडांनी प्रचंड दहशत माजवली. सिमेंट बंधाऱ्याचे काम करू दिले नाही. ढाकणी गावातील गरीब मागासवर्गीय शेतकऱ्यांना जातीवाचक शिवीगाळ केली .हे सिमेंट बंधाऱ्याचे काम न झाल्यामुळे सुमारे २५ एकर शेती पाण्याविना पडून राहिली. अखेर काही शेतकऱ्यांनी ऊस ज्वारी बाजरी व फळबाग लागवडीसाठी पाण्याची स्वतः व्यवस्था करून शेती पिकाला जीवदान दिले. काम बंद पडल्यामुळे दलित शेतकऱ्यांचे खूप मोठे नुकसान झालेले आहे.
पान २ वर



# पाच मिनिटांच्या उशिराकरिता ५० उठाबशा

**तीन दिवसांपासून दहावीतील विद्यार्थिनी रुग्णालयात**

● पालघर, सुचिता सोनावणे :

शाळेत येण्यास पाच मिनिटांचा विलंब झाल्यामुळे पालघर येथील एका नामांकित शाळेच्या मुख्याध्यापिकेने दहावी इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थिनीला ५० उठाबशा काढण्याच्या दिलेल्या शिक्षेमुळे त्या मुलीवर आजारपण ओढवले आहे.
पान २ वर

# तीन वर्षाच्या चिमुरडीवर लैंगिक अत्याचार; उरण हादरले

● उरण, भावना जैन :

यशश्री शिंदे कांडा मधून उरणकर सावरतात तोच उरण मोर फड न.५ मध्ये वास्तव्यास असणाऱ्या ३ वर्षाच्या चिमुरडीवर तिच्या शेजारी राहणाऱ्या नराधमाने लैंगिक अत्याचार केल्याच्या घटनेने संपूर्ण उरण हादरून गेले आहे. लैंगिक अत्याचार करणाऱ्या आरोपीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी उरणच्या नागरिकांमधून होत असून सदरची घटना उरण मोरा येथील फड न.५ मोहन स्टोर,सिंडीकेट बँकेच्या जवळील डोंगरावर असणाऱ्या झोपडपट्टी परिसरात घडली आहे.

या कामी मुलीच्या आईने मोर सागरी पोलीस ठाण्यातफिर्याद दिली असून फिर्यादीत तिने म्हटले आहे. माझे पती,दोनमुलगे अनुक्रमे १० व ९ वर्षाची दोन मुले ३ वर्षाची मुलगी व सासरेअसा परिवार एकत्रितपणे राहतो १३ जानेवारीस मी मुलीला शेजारच्या आंगणवाडीत सकाळी ११ वाजण्याच्या सुमारास सोडली व दुपारी १ वाजता न तिला घरी आणली असल्याचे तिने आपल्या फिर्यादी मध्ये नोदविले आहे.

त्यानंतर आई घरातील आई कपडे धुण्याघरात गेली परंतु



मुलगी अंगणात खेळण्यासाठी जाण्या करिता रडू लागलीती बाहेर जाऊ नये म्हणून दाराला प्लॅउड लाऊन अडकून ठेवले मुलगी जोरजोरात का रडते त्यामुळे त्यांचा शेजारी राहणारा दिनेश नितेकर(५०)हा तेथे आला व मुलगी रडण्याचे कारण त्यांनी विचारले व मुलीला त्यांनी खेळण्या साठी अंगणात सोडले की वेळातआई काम आटोपून आली अंगणात मुलगी दिसत नाही पाहून तिने दिनेश नितेकर याल मुली संदर्भात विचारण केली असता मुलगी गल्लीत खेळत असल्याचे त्यांनी सांगितले आईने गल्लीत शोध घेतला परंतु मुलगी दिसत नसल्याने तिने दिनेश नितेकर यास पुन्हा विचारणा केली असता मुलगी संडासाच्या दरवाज्य जवळ असल्याचे तो म्हणाला.

आई मुलीला आणण्या साठी गेली असता मुलगी घाबरून आईला बिलगुन जोरजोरात रडू लागली आईने उचलून तिला घरी आणलेतिला ताप भरला म्हणून उरण मधील अभिनव चाईल्ड केअर क्लिनिक मध्ये नेले असता तेथी डॉ.अजय कोळी यानी तापावरऔषध देऊन घरी जाण्यास सांगितले परंतु तीन दिवसा नंतरही ताप उतरला नाही आणि मुलीने दिनेश काकाने शूच्या जागी हात लावल्याचे सांगितले,त्यामुळे मुलीला उरण मधील गाडे हॉस्पिटल मधे नेले असता डॉ.प्रीती गाडे यांनी तिची पूर्ण तपासणी करून गुप्त अंगावर जखमा असल्याचे लेखी पत्रच दिले त्यानंतर आईच्या पाया खालची वाळू सरकली तिनेथेट मोर सागरी पोलीस ठाणे गाठून या बाबत दिनेश निवेतकर यांच्या विरोधात फिर्याद नोंदविली.

# अक्षय शिंदे एन्काउन्टर प्रकरणात पाच पोलिसांवर दाखल होणार गुन्हा



● बदलापूर, गणेश बागडे :

बदलापूर अल्पवयीन मुलींवरील अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेचं कथित एन्काउन्टर करणं पोलिसांना भोवलं आहे. आरोपीच्या मृत्यू प्रकरणी ५ पोलीस जबाबदार असल्याचं दंडाधिकाऱ्यानं चौकशी आयोगानं अहवालात म्हटलं आहे. हा अहवाल मुंबई उच्च न्यायालयात सादर करण्यात आला. मुंबई उच्च न्यायालयासमोर मांडण्यात आलेल्या अहवालात अक्षय शिंदेचा मृत्यू संशयास्पद असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. प्रकरणात गुंतलेल्या पाच पोलिसांविरोधात फौजदारी प्रक्रियेद्वारे खटला चालवण्यात येईल. या प्रकरणी ॲड अजिंक्य गायकवाड आणि ॲड कविशा खन्ना यांनी यामध्ये मुळ तक्रार दाखल केली होती. या प्रकरणातील तपास अधिकारी पोलीस निरीक्षक शुभदा शितोळे यांच्याविरोधात फौजदारी खटला चालवण्याची मागणी न्यायालयासमोर केली आहे. वकिलांच्या मागणीनंतर न्यायालयानं या प्रकरणी सरकारी वकिलांना या मागणीची दखल घेण्याचे निर्देश दिले आहेत. अक्षय शिंदेच्या मृत्यूला पाच पोलीस जबाबदार आहेत. त्यामुळे त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल करुन कारवाई करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयानं दिले आहेत.
पान २ वर

# 'लाडक्या बहिणींसाठी ३,७०० कोटींचा चेक दिला' - अर्थमंत्री अजित पवार



● मुंबई, विशाल कारंडे :

लाडकी बहीण योजना महायुतीला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी महत्त्वाची ठरली होती. नोव्हेंबरमध्ये निवडणुकीची प्रक्रिया पार पडल्यानंतर नव्या वर्षाचे हप्ते कधीपासून सुरू होणार, याचीच उत्सुकता योजनेच्या लाभार्थी महिलांना लागली होती. तसेच योजनेबाबत अनेक शंकाकुशंका उपस्थित केल्या जात होत्या. योजनेसाठी निकष लावले जाणार असून अनेक महिला अपात्र ठरू शकतात, अशीही चर्चा मध्यंतरी होती. यावर आता उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. कोणत्या महिलांना या योजनेचा लाभ मिळणार नाही, हे त्यांनी सांगितले आहे. तसेच लाभार्थी महिलांना पुढचा हप्ता कधीपासून मिळणार? याची तारीखही त्यांनी सांगितली आहे. "महायुतीचे सरकार आले तर लाडक्या बहिणींना पैसे मिळणार नाहीत, ते योजना बंद करतील, असा आरोप विरोधकांनी आमच्यावर केला. पण माझ्याकडे अर्थ खाते आहे. आम्ही वचनपूर्ती करणारच आहोत. पण योजनेतल्या त्रुटी असतील त्या आम्ही काढू. जी भगिनी खुरपणीला जाते, धुणी-भांडी करते, जी अतिशय गरीब कुटुंबातून आली आहे. जिल्हा १५०० रुपयांचे महत्त्व समजते, तिलाच योजनेचा लाभ दिला जाईल. ज्या महिला प्राप्तीकर भरतात, ज्या मोठा पगार घेतात, अशा महिलांसाठी हे दीड हजार रुपये नाहीत", असे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.
पान २ वर

# एआयच्या माध्यमातून करण्यात आली उसाची शेती

● पुणे, अभिजीत येरल्लू :

भारत हा कृषीप्रधान देश असून, आजही इथे मोठ्या प्रमाणावर पारंपरिक पद्धतीनं शेती केली जाते. शेतीमध्ये मोठ्या प्रमाणावर विविध संशोधन होताना आपल्याला पाहायला मिळते. राज्यात तर उसाची शेती ही मोठ्या प्रमाणावर होत असून, गेल्या अनेक वर्षांपासून पारंपरिक पद्धतीने ही उसाची शेती केली जाते. मात्र आता बारामतीच्या ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या माध्यमातून देशातील पहिला प्रयोग करण्यात आलाय आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर करून कमी खर्चात अधिक उत्पादन देणारी ऊसशेती




करणं शक्य झालंय. बारामती येथे कृषी विज्ञान केंद्राच्या प्लॉटवर 'कृषिक २०२५' कृषी प्रदर्शनात एआयच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या ऊसशेतीचं प्रयोग शेतकऱ्यांना दाखवण्यात येताहेत. यावेळी मोठ्या संख्येने नागरिक हे या तंत्रज्ञानाची पाहणी करीत आहेत. बारामती ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट, मायक्रोसॉफ्ट, ऑक्सफर्ड विद्यापीठ यांनी एआय या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून कमी खर्चात अधिक उत्पादन देणारी ऊसशेती विकसित केलीय. तब्बल एक हजार शेतकऱ्यांच्या शेतातील उसावर हा प्रयोग करण्यात आला असून, त्याचे चांगले आणि फायदेशीर असे परिणाम समोर आलेत. शेतीमध्ये तसेच ऊस शेतीत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर तंत्रज्ञान तसेच विविध संशोधन समोर आलं असतानादेखील आजही अनेक लोक पारंपरिक पद्धतीनं शेती करतात आणि शेतीतील परिपूर्ण माहितीच्या अभावामुळे उत्पादन खर्च वाढतो आणि उत्पादनदेखील घटते.
पान २ वर

■ कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच एआयच्या माध्यमातून आपल्याला आपल्या शेतीमधील माती, जमिनीची माहिती, खतांची माहिती, वातावरण बदलाची माहिती आणि नेमकी गरज काय आहे याची माहिती मिळणं शक्य झालंय. तसेच जमिनीत जो सेन्सर लावण्यात येतो, त्यातून जमिनीचा ओलावा, तापमान आणि बदल याची माहिती मिळते. तसेच महत्त्वाची बाब म्हणजे सॅटेलाइटद्वारे मॉनिटरिंग केली जाते आणि याबाबत अलर्ट हे सातत्याने शेतकऱ्यांना दिलं जातं. ज्या एक हजार शेतकऱ्यांच्या शेतात हा प्रयोग करण्यात आलाय, त्या शेतकऱ्यांच्या गेल्या वर्षीच्या उत्पादनाच्या ४० टक्के उत्पादनात वाढ होताना पाहायला मिळालीय, असंही यावेळी डॉ. भूषण गोसावी यांनी सांगितलंय.

## संपादकीय

# बांगलादेशी अल्पसंख्याकांना न्याय, एक आशा - एक दिशा

बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याकांवरील हिंसाचाराच्या घटनांमध्ये सतत वाढ होत आहे. ब्रिटिश-इराणी पत्रकार सहार झांड यांनी त्यांच्या बांगलादेश दौऱ्यादरम्यान, जातीय हिंसाचार आणि हिंदू समुदायाच्या दुर्दशेचा गंभीर आढावा घेतला आहे. त्यांच्या 'रेडिओ माहितीपट' मालिकेतील खुलासे आणि ताज्या घटनांचा तपशील बांगलादेशात घडणाऱ्या गंभीर परिस्थितीचे दर्शक आहे.

२०२४ साली बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांना पंतप्रधान पदावरून हटवल्यानंतर, देशातील हिंदू अल्पसंख्याकांवरील अत्याचारात झपाट्याने वाढ झाली आहे. ५ ऑगस्ट २०२४ पासून सुरू झालेल्या हिंसाचाराच्या मालिकेत, पहिल्याच तीन दिवसांत २०५ हल्ले घडले आहेत, ज्यात हिंदू मंदिरे, दुकाने आणि स्थानिक व्यवसायांचा समावेश आहे. बांगलादेशी इस्लामिक कट्टरपंथींनी ६० हिंदू शिक्षक, प्राध्यापक आणि सरकारी अधिकाऱ्यांना त्यांच्या पदांचा राजीनामा देण्यास भाग पाडले.

या हिंसाचाराच्या घटनांबद्दल अनेक वेगवेगळया दाव्यांचे खंडन करत, पत्रकार झांड यांनी 'वॉईसेस ऑफ चेंज' या बांगलादेशी युट्यूब चॅनलवर चार भागांची माहितीपट मालिका 'कम्युनल वॉयलेन्स इन बांगलादेश : द प्लाईट ऑफ हिंदूज इन बांगलादेश' शीर्षकाखाली प्रदर्शित केली. यात बांगलादेशातील हिंदू समुदायावर होणाऱ्या अत्याचारांचे दस्तावेजीकरण करण्यात आले आहे.

सहार झांड यांच्या माहितीपटानुसार, बांगलादेशात उत्तर बांगलादेशात हिंदूंवर दर आठवड्याला सात ते आठ हल्ल्यांची नोंद केली जाते. यामध्ये बलात्कार, खंडणी, घरांची नासधूस आणि खून यांसारख्या घटनांचा समावेश आहे. बांगलादेशातील हिंदू समुदायाने देश सोडण्याच्या विचारात आहेत, कारण त्यांना वाटते की, येथे त्यांचे भविष्य असुरक्षित आहे.

झांड यांनी माहितीपटाच्या एका भागात १४ वर्षीय हिंदू मुलाचा घटनाक्रम सांगितला आहे, ज्याला भारतीय सीमेजवळ पळून जाण्याच्या प्रयत्नात 'बॉर्डर गार्ड बांगलादेश'च्या जवानांनी ठार केल्याचे उघड झाले.

बांगलादेशी कट्टरपंथी आणि धर्मगुरू महमुदुल हसन गुनोवी यांचे वक्तव्य, जे हिंदूविरोधी हिंसाचाराला वाढवणारे आहे, त्याची देखील तपासणी करण्यात आली आहे. गुनोवी यांच्या भडकावणाऱ्या वक्तव्यानुसार, मोहम्मद पैगंबराचा अपमान करणाऱ्याला मारण्याचा इस्लामिक कायदा सांगितला जातो, जो हिंसाचाराला खतपाणी घालतो.

दुसऱ्या अनेक घटनांमध्ये, पत्रकार सहार झांड आणि त्यांच्या सहकाऱ्यांवर माहिती संकलन करत असताना हल्ला करण्यात आला. यामुळे तेथे होणारे दडपशाहीचे प्रमाण आणि भयाची स्थिती उघड झाली आहे. तरीही, स्थानिक कार्यकर्ते बनमाली आणि सुकांतो यांनी स्वबळावर लढण्याची तयारी दर्शवली आहे, जे बांगलादेशातील हिंदू समुदायाच्या हक्कांसाठी झगडत आहेत.


बांगलादेशातील सध्याच्या परिस्थितीवर झांड यांनी शंकार राय आणि अन्य स्थानिक हिंदू कार्यकर्त्यांसोबत संवाद साधला. राय यांनी सांगितले की, कट्टरपंथी हिंदूंना बांगलादेशातून हाकलण्याचा प्रयत्न करत आहेत. याचवेळी, हिंदू धर्माचे प्रतीक असलेल्या मंदिरांवर होणारे हल्ले आणि जिहादी हिंसाचार हे चिंता वाढवणारे आहेत.

बांगलादेशातील या वाढत्या अत्याचारांचा आवाज आता स्थानिक हिंदू लोकांनी उचलला आहे. त्यांच्याकडून संघटित होऊन, युनूस सरकार विरोधात संघर्ष करण्याची इच्छाशक्ती दिसून येत आहे. भारत सरकारनेही या संदर्भात योग्य पावले उचलायला सुरुवात केली आहे, ज्यामुळे बांगलादेशी अल्पसंख्याकांना न्याय मिळावा, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

संपूर्ण बांगलादेशात हिंदू अल्पसंख्याकांवरील अत्याचार थांबविण्याच्या दिशा आणि उपाययोजनांबद्दल जागरूकता वाढवणे, हे या परिस्थितीला समोरे जाण्याचे महत्त्वाचे पाऊल आहे.

**-अनिकेत घनश्याम भंकाळ**

## आजची चित्रोळी



प्रपात नाणेघाटामधला
वाऱ्यावरती उडतो !
कोसळण्याला घांबरून जणू
परत माघारी फिरतो !!

**मुकुंद कुलकर्णी, मुंबई**

# यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारासाठी अर्ज पाठविण्याचे आवाहन

**ठाणे (रोहित जैसवार):-** सन २०२४ वर्षातील मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी राज्य शासनाच्यावतीने स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार देण्यात येणार आहे. १ जानेवारी २०२४ ते ३१ डिसेंबर २०२४ या कालावधीत प्रकाशित झालेले प्रथम आवृत्ती पुस्तके स्पर्धेसाठी पात्र आहेत. लेखकांनी पुरस्काराच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून) दि. ३१ जानेवारी, २०२५ पर्यंत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत मुंबई येथे आपले साहित्य पाठवावीत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या सचिव यांनी प्रसिद्धीपत्रकान्वये केले आहे.

या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ यांच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता अन्यत्र संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध आहेत. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२४ नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व 'What's new' या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature Award 2024 Rules Book and Application Form' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील. प्रवेशिका पूर्णतः भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ ते ३१ जानेवारी २०२५ या विहित कालावधीत पोहचतील अशा पाठवाव्यात.

लेखक/प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक/प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून अन्य ठिकाणच्या लेखक/प्रकाशकांनी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हे साहित्य दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या विहित कालावधीत पाठवावे, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद आहे.

लेखक/प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर/पाकीटावर 'स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२४ साठी प्रवेशिका'असा स्पष्ट उल्लेख करावा. प्रवेशिका व पुस्तके स्विकारण्याचा अंतिम दिनांक ३१ जानेवारी, २०२५ हा राहील. विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्विकारल्या जाणार नाहीत.

# समाजात समाजप्रबोधनाचे महान कार्य वारकरी संप्रदायातील वारकरी करतात - आ.महेंद्र थोरवे

**कर्जत (सम्यक कासारे) :-** समाजात समाज प्रबोधनाचे कार्य वारकरी पंथातील वारकरी हे काम करत असतात. मी या श्री अंबे मातेच्या मंदिरात नेहमीच नतमस्तक होत असतो, निवडणुकीत देखील आलो व मातेने मला आशीर्वाद दिला, व निवडून आलो असे प्रतिपादन आमदार महेंद्र थोरवे यांनी केले . कर्जत नगर परिषद हद्दीतील भिसेगाव येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळा सेवा संस्था व ग्रामस्थ व महिला मंडळ भिसेगाव यांच्या माध्यमातून " श्री ज्ञानेश्वरी पारायण व ज्ञानयज्ञ सोहळा" श्री अंबे भवानी माता मंदिर भिसेगाव येथे शनिवार दिनांक १८ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळी ठीक ७ वाजता दीपोत्सव सोहळा व सत्कार आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी व्यासपीठावर ह भ प श्रीराम पुरोहित हे.भ.प दिपक महाराज जगताप, हे.भ.प रामदास महाराज पाटील ह.भ.प विजय महाराज थोरवे, ह.भ.प सुदाम महाराज थोरवे, पोलिस निरीक्षक सुरेंद्र गरड,माजी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी माजी नगरसेविका पुष्पा ताई दगडे, माजी नगरसेवक सोमनाथ ठोंबरे, भिसेगाव पोलीस



पाटील संजय हजारे, पत्रकार जयेश जाधव, सुभाष सोनावणे आदी उपस्थित होते याप्रसंगी यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांचे शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.त्यानंतर सर्व श्री विठ्ठल भक्तांनी पसायदान करून ज्योत पेटवून मोठ्या उत्साहात दीपोत्सव साजरा केला. यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांनी, पुढे बोलताना सांगितले की भिसेगाव येथे २० वर्षे अखंड हरिनाम सप्ताह होत असून या सप्ताहाच्या माध्यमातून सांप्रदायिक प्रथा महिला भगिनींनी सुरू ठेवली आहे, यावर त्यांनी प्रकाश टाकला. प्रत्येक गावात राणे महाराज, जगताप महाराज यांचे योगदान आहे, हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून सांप्रदाय राबवले जात आहे, समाजाला नव्याने दिशा देण्याचे काम करत आहेत. आम्ही देखील विकासाच्या माध्यमातून भक्ती पंथाचे काम करत ५२ फुटी ची श्री विठ्ठलाची मूर्ती उल्हास नदीच्या तीरी वसविली आहे, देशभरात फिरत असताना धार्मिक स्थळे फिरत असताना पर्यटकांमुळे शहराची आर्थिक स्थिती सुधारत आहे, हे पाहिले. वयोवृध्द वारकरी बांधवांना श्री विठ्ठलाचे दर्शन घेता यावे, म्हणून येथे प्रती पंढरपूर उभे केले आहे, वारकरी सांप्रदाय समाज प्रबोधनाचे कार्य सुरू आहे, यासाठी काय काय मदत लागेल ते करण्याचे आश्वासन त्यांनी याप्रसंगी केले, या परिसरात देखील रस्ते आपण सुस्थितीत केले आहेत, नाम स्मरणाने, भजन कीर्तनाने आपले दुःख दूर होतात, मात्र त्यात सातत्य असले पाहिजे, पांडुरंगाचा आशीर्वाद घेवून मी काम करत आहे, त्यांचा वसा घेवून जात आहे.

## पान १ वरून...

### जंगलातील मध्यवर्ती भागामध्ये स्थानिक...

वनमंत्री गणेश नाईक हे १९९५ ला वन विभागाचे मंत्री असताना त्यांनी जपान येथील सुमीटोमो कॉर्पोरेशन सोबत महाराष्ट्र वन विभागाचे महामंडळ म्हणजेच फॉरेस्ट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड यांच्यामध्ये करार करून वृक्ष लागवड करण्याची योजना व सुमीटोमो कॉर्पोरेशन मार्फत निधीबाबत करार केला होता. याच धर्तीवर आता जगातील इतर देशातील कॉर्पोरेशन सारख्या इतर यंत्रणासोबत संपर्क साधून वनविभागाकरिता नाविन्यपूर्ण प्रस्ताव तयार करून निधी उपलब्ध करण्याकरिता वन अधिकारी यांचे शिष्टमंडळ तयार करण्याच्या सूचना श्री.नाईक यांनी वरिष्ठ वन अधिकाऱ्यांना दिल्या. वन अधिकाऱ्यांचे शिष्टमंडळ परदेशात अभ्यास दौऱ्यासाठी पाठविणार असून वनामधील कोर भागामध्ये स्थानिक फळझाडे लावण्याबाबत सूचना दिल्या. यामध्ये रायवली आंबा, बोर, जांभूळ या रोपांची लागवड करा, बहाडोली जांभूळ (पालघर) तसेच आंबा कलम करून त्यांची रोपवाटिकेमध्ये रोपे तयार करावीत. ही रोपे जंगलातील मध्यवर्ती भागात लावल्यामुळे त्या भागात मांसभक्षी प्राण्यांच्या भक्ष्यांची संख्या वाढून मनुष्य वन्यजीव संघर्ष कमी होईल.वनमंत्री महोदयांनी पुढील काळामध्ये प्रत्येक आठवड्याला एका जिल्ह्याचा दौरा करणार असल्याचे स्पष्ट केले. या दौऱ्यांची सुरुवात कोकणातून करणार असून समुद्रकिनाऱ्यालगत असलेल्या कांदळवनाची परिस्थिती पाहण्याकरिता जहाजाने समुद्री प्रवास करण्याकरिता नियोजनाबाबत सूचना दिल्या.वनमंत्री महोदयांनी अटल सेतू ब्रिज वरून कांदळवनाची पाहणी केली असून तेथील खाडीलगतच्या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात कांदळवनाचे रोपवन घेण्याकरिता स्थळ पाहणी करण्याच्या सूचना केल्या. क्षेत्रीय वन अधिकारी-कर्मचारी यांच्यासोबतच्या चर्चासत्रामध्ये वनमंत्री श्री.नाईक यांनी प्रत्येक संवर्गामधील वन कर्मचारी यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या व त्याबाबत शासनस्तरावर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत आश्वसन दिले.

शेवटी पेंच व्याघ्र प्रकल्प नागपूर, वन्यजीव यांचे २०२५ वर्षासाठीच्या दिनदर्शिकेचे तसेच भारतीय वन सेवेतील वन अधिकारी यांच्या सिव्हिल लिस्ट २०२५ चे प्रकाशन वनमंत्री श्री.नाईक यांच्या हस्ते करण्यात आले.

### मराठी बंधु-भगिनींचे प्रेम अनमोल, मला या...

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिला असून मराठीला ज्ञानभाषा म्हणून प्रस्थापित करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यासाठी स्वित्झर्लंडसह वैश्विक मराठी परिवारातील मराठी बंधु-भगिनी आमचे राजदूत असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. याप्रसंगी बृह्न महाराष्ट्र मंडळ, स्वित्झर्लंडचे अध्यक्ष अमोल सावरकर, सेक्रेटरी किर्तीताई गद्रे, महेश बिरादार व इतर मान्यवर उपस्थित होते.

### शासकीय निवासी शाळेतील २३ विद्यार्थ्यांना...

त्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या वाढली आणि सध्याच्या घडीला २३ विद्यार्थ्यांवर रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. या सर्वांनाच प्रामुख्यानं पोटदुखी आणि जुलाब होत असल्याची तक्रार होती. या सर्व विद्यार्थ्यांच्यावर उपचार सुरू असून सध्या सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर आहे. उपचार घेणाऱ्या निवासी शाळेतील विद्यार्थ्यांनी सांगितलं, रविवारी चिकन आणि मटण हे जेवणात खाल्लं होतं आणि त्यानंतर दूध पिलं होतं. त्यानंतर आज सकाळपासून आम्हाला पोटदुखी, जुलाब, उलट्या असा त्रास सुरू झाला. त्याबाबत शाळेच्या शिक्षकांना त्याची कल्पना दिली. त्यानंतर आम्हाला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आलं.समाजकल्याण विभागाच्यावतीनं विट्यामध्ये 'निवासी विद्यार्थी शाळा' चालवली जाते. या शाळेमध्ये जवळपास ९३ विद्यार्थी शिकतात. रविवार असल्यानं काही विद्यार्थी हे आपल्या घरी गेले होते. तर या ठिकाणी ४९ विद्यार्थी उपस्थित होते. यामधील २३ विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी विशाल नलवडे यांनी दिली.

### ढाकणी (तुपेशेत) मंजूर बंधारा सुरू करणे...

याबाबत शासनाचे लक्ष वेधून घेण्यासाठी रविवार दिनांक २६ जानेवारी रोजी संबंधित शेतकरी आंदोलन करणार आहेत. त्यामुळे या परिसरात जिल्हा प्रशासनाने जाणीवपूर्वक लक्ष वेधून हा प्रश्न सामंजसपणाने सोडवावा अशी मागणी होऊ लागलेली आहे.

### पाच मिनिटांच्या उशिराकरिता ५० उठाबशा

त्या मुलीवर गेल्या तीन दिवसांपासून खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असून २० दिवसांवर दहावीची परिक्षा आली असताना या प्रकाराबाबत पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.पालघर शहरातील भगिनी समाज विद्यालयातील दहावी इयत्तेत शिकणारी पालघर (टेंभोडे) येथील राहणारी १३ वर्षीय विद्यार्थिनीला १७ जानेवारी रोजी सकाळी शाळेत येण्यास पाच मिनिटांचा विलंब झाला. यामुळे शाळेच्या मुख्याध्यापिकेने त्या मुलीला ५० उठाबशा काढायला लावल्या. उठाबशा काढल्यानंतर त्या मुलीच्या पायात व मांड्यांमध्ये गोळे आले व पोटदुखीचा त्रास सुरू झाला. त्यानंतर काही वेळाने उलटीचा झाल्याने या विद्यार्थिनीला पालघर येथील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले.घडलेल्या प्रकाराबाबत मुलीच्या पालकांनी पालघर पोलीस स्टेशन येथे १९ जानेवारी रोजी तक्रार दाखल केली. दोन्ही पक्षांना पोलीस निरीक्षक अनंत पराड यांनी आज जबाबासाठी पालघर पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. याच मुलीने यापूर्वी शाळेत बुट घातले नसल्याने मासिक पाळी सुरू असताना मैदानावर पळविण्याची शिक्षा दिली होती, अशी माहिती मुलीच्या आईने पोलिसांसमक्ष दिली. यावेळीसुद्धा तिला त्रास झाल्याचे पालकांनी उपस्थितांच्या निदर्शनास आणून दिले. या प्रकाराबाबत गुन्हा दाखल होण्याची स्थिती निर्माण झाली होती. मात्र पीडित मुलीने रुग्णालयातून पालकांना संपर्क करून तक्रार दाखल करू नये अशी विनंती केली. त्यामुळे सामंजस्याने पालकांनी तक्रार मागे घेतल्यामुळे संबंधितांविरुद्ध कारवाई टळली. मात्र अशा प्रकारचे अघोरी कृत्य पुन्हा होणार नाही याची काळजी घेण्यात यावी अशी सक्त ताकीद पोलीस निरीक्षक अनंत पराड यांनी शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांना दिली. या शाळेतल्या काही पुरुष शिक्षकांकडून स्टीलच्या पट्टीने विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांना मारल्याच्या तक्रारी पालकांकडून करण्यात आल्या होत्या.याबाबत भगिनी समाज विद्यालयाच्या माध्यमिकच्या मुख्याध्यापिका प्रणिता वर्तक यांच्याशी संपर्क साधला असता आपण या मुलीला भेटायला रुग्णालयात गेल्याचे या प्रकरणात सामंजस्याने तक्रार मागे घेण्यात आली आहे, असे सांगितले. तसेच असे प्रकार यानंतर शाळेत कधीही होणार नसल्याचे त्यांनी लोकसत्ताला सांगितले.दहावीची परीक्षा अवघ्या २० दिवसांवर येऊन ठेपली असताना आपली कन्या अद्याप रुग्णालयात दाखल असल्याने या शिक्षेमुळे तिचे मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे असे मत तिच्या पालकांनी व्यक्त केले

### अक्षय शिंदे एन्काउन्टर प्रकरणात पाच...

अक्षय शिंदेच्या कथित एन्काउन्टर प्रकरणी न्यायालयानं दंडाधिकारी चौकशीचे आदेश दिले होते. त्याचा अहवाल सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात सोपवण्यात आला. अक्षय शिंदे याच्या हाताचे ठसे बंदुकीवर नसल्याचं अहवालात नमूद करण्यात आलं आहे. सरकारी वकिलांनी या प्रकरणी योग्य ती कार्यवाही केली जाईल, असं न्यायालयाला सांगितलं. या मुद्द्यावर पुढील सुनावणी वेळी युक्तिवाद केला जाईल. या प्रकरणी पुढील सुनावणी दोन आठवड्यानंतर ठेवण्यात आली आहे.काय आहे बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरण- बदलापूरमधील एका शाळेच्या शौचालयात दोन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार झाल्याची घटना घडली होती. त्यावेळी नागरिकांचा मोठा उद्रेक झाला होता. आरोपीला अटक करण्याची मागणी करत नागरिकांनी दिवसभर उपनगरीय रेल्वे सेवा रोखली होती. ऑगस्ट २०२४ मध्ये अक्षय शिंदेला करण्यात आली होती. सप्टेंबरमध्ये, चौकशीसाठी तळोजा तुरुंगातून नेले जात असताना पोलिसांच्या कथित गोळीबारात त्याचा मृत्यू झाला होता. पोलिसांच्या दाव्यानुसार पोलीस व्हॅनमध्ये असताना आरोपीनं पोलीस कर्मचाऱ्याची बंदूक हिसकावून घेत गोळीबार केला. यावेळी प्रत्युत्तरात पोलिसांनी केलेल्या गोळीबारात आरोपीचा मृत्यू झाला.

### 'लाडक्या बहिणींसाठी ३,७०० कोटींचा चेक...

अजित पवार पुढे म्हणाले, ज्या महिलांचे वार्षिक उत्पन्न अडीच लाख रुपयांच्या आत आहे. म्हणजे महिन्याला २१ हजारांच्या आत वेतन असलेल्या महिलांनाच आपण ही मदत देणार आहोत. काही काहींनी मधल्या काळात योजनेचा लाभ घेतला. आम्हीही वेळ जाईल म्हणून त्यात फार बारकाईने लक्ष दिले नाही. आता मात्र माझ्या लाडक्या बहिणींना आवाहन आहे की, ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांच्या वर आहे, त्यांनी गरीब महिलांकरिता लाडकी बहीण योजनेचा लाभ घेऊ नये. मागे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आवाहन केल्यानंतर अनेकांनी गॅसचे अनुदान सोडले होते. तशाच प्रकारे आताही केले जावे.निवडणुकीच्या निकालानंतर आम्ही थोडे व्यस्त होतो. पण परवाच महिला व बाल विकास खात्याकडे ३,७०० कोटींचा चेक दिला असल्याचेही उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले आहे. आता काही महिलांच्या खात्यात पैसे येण्यास सुरुवात झाली आहे किंवा २६ तारखेपासून लाडक्या बहिणींच्या खात्यात पैसे येण्यास सुरुवात होईल.

### एआयच्या माध्यमातून करण्यात आली...

पण आता एआयच्या माध्यमातून करण्यात आलेल्या या प्रयोगाने शेतकऱ्यांना उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत वाढ आणि उत्पादन खर्चात २० ते ४० टक्क्यांची घट आणि ३० टक्के पाण्याची बचत होणार आहे.याबाबत डॉ. भूषण गोसावी यांनी सांगितलं की, उसामध्ये आम्ही नवीन क्रांती केलीय. यात एआय या कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून उसाचं उत्पन्न हा एकरी १६० टनांपेक्षा कसा घेऊन जाऊ शकतो, याचं सादरीकरण करण्यात आलंय. या प्रयोगाला सुरुवात ही तीन वर्षांपूर्वी करण्यात आली होती. फॉर्म ऑफ द फ्युचरच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञान तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेद्वारे पिकांमध्ये कशी क्रांती करू शकतो, पाण्याचा कमी वापर, तसेच खताचा कमी वापर आणि उत्पादनात कशी वाढ करू शकतो या उद्देशाने आम्ही संशोधनाला सुरुवात केलीय आणि मार्च २०२४ पासून एक हजार शेतकऱ्यांच्या शेतीत हा प्रयोग सुरू केल्याचं यावेळी गोसावी यांनी सांगितलंय. ऊसशेतीमध्ये 'एआय' चा वापर केला तर यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात ४० टक्क्यांपर्यंत वाढ होईल. तसेच ३० ते ४० टक्के पाण्याची बचत होणार आहे आणि उत्पादन खर्चात २० ते ४० टक्क्यांची घटदेखील होईल आणि जमीन सुपिकतेमध्ये वाढ होईल. सेंद्रिय कर्ब मूल्यमापनाद्वारे भविष्यात शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटचा फायदा मिळेल आणि कापणी कार्यक्षमतेत ३५ टक्क्यांपर्यंत सुधारणा होताना पाहायला मिळेल आणि रासायनिक खतांच्या वापरात २५ टक्के घट तसेच सातत्याने पीक निरीक्षणामुळे कीटकनाशकांच्या वापरात २५ टक्के बचत, असे अनेक फायदे हे आपल्याला होताना पाहायला मिळणार आहेत.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कल्याण शहरात निर्माण होणारे सुसज्ज आयसीए भवन शहरासाठी अभिमानास्पद - खा. डॉ. श्रीकांत शिंदे

## कल्याणातील इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्सच्या भव्य इमारतीचे भूमीपूजन




**कल्याण (विवेक गुंजाळ) :** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट्स ऑफ इंडिया म्हणजेच आयसीएआय या देशातील नामांकित संस्थेचे कल्याणात होणारे सुसज्ज आयसीएआय भवन हे शहरासाठी अतिशय अभिमानास्पद बाब असल्याचे गौरवोद्गार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी काढले. चार्टर्ड अकाऊंटंट्स संस्थेच्या कल्याण डोंबिवली शाखेच्या इमारतीच्या भूमीपूजन कार्यक्रमात प्रमूख पाहुणे म्हणून खा. डॉ. श्रीकांत शिंदे बोलत होते. कल्याणात होणाऱ्या या चार्टर्ड अकाऊंटंट्स संस्थेच्या सुसज्ज इमारतीचा लाभ केवळ कल्याण डोंबिवलीच नव्हे तर भिवंडी, शहापुरपासून थेट बदलापूर, कर्जतपर्यंतच्या विद्यार्थ्यांना होणार आहे. विद्यार्थ्यांना आता सीए संबंधित शिक्षण- प्रशिक्षणासाठी मुंबईला न जावे लागता आता याच इन्स्टिट्युटमधून सर्व गोष्टी उपलब्ध होणार आहे. आम्ही सर्व जण यापुढेही आपल्यासोबत असून एक चांगली संस्था याठिकाणी उभी करा असे आवाहनही खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांनी यावेळी केले.

कल्याणात होणाऱ्या या सुसज्ज आयसीएआय भवनमुळे सामान्य कुटुंबातील मुलांनाही आता सीए होण्यासाठी दिशा आणि व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची भावना कल्याण पश्चिमेचे आमदार विश्वनाथ भोईर यांनी यावेळी व्यक्त केल्या. या आयसीएआय भवनमूळे कल्याण शहराचे नाव आणखी उंचावले जाणार असून इथल्या भावी पिढीला करिअरसाठी हे भवन एकप्रकारे वरदान ठरेल असा आशावादही आमदार भोईर यांनी यावेळी व्यक्त केला.

तर भारत देश प्रजासत्ताक होण्यापूर्वीच म्हणजेच १९४९ मध्ये आयसीएआय संस्थेची निर्मिती झाली आणि संविधानही अस्तित्वात आले. ते पाहता देशाच्या जडण घडणीमध्ये ही संस्था आणि या संस्थेच्या देशातील लाखो सीएंचे मोठे योगदान असल्याचे मत आयसीएआय संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष रणजित अग्रवाल आणी राष्ट्रीय उपाध्यक्ष चरणज्योतसिंग नंदा यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच गेल्या दोन वर्षांमध्ये देशात आयकर भरणाऱ्यांची संख्या तब्बल १२ टक्क्यांनी वाढल्याची माहिती देत देशाच्या आर्थिक विकासातील सीएंचे महत्त्व अग्रवाल यांनी यावेळी अधोरेखित केले.

कल्याण डोंबिवली शाखेचे दिवा भिवंडीसह थेट कर्जत कसाऱ्या पर्यंतच्या भागातील तब्बल ५ हजारांहून अधिक चार्टर्ड अकाऊंटंट सदस्य आणि १५ हजारांहून अधिक विद्यार्थी संलग्न आहेत. कल्याण डोंबिवली महापालिकेकडून कल्याण पश्चिमेतील चिकणघर परिसरात तब्बल १७ गुंठ्यांचा भुखंड चार्टर्ड अकाऊंटंटसच्या कल्याण डोंबिवली शाखेला उपलब्ध करून देण्यात आला आहे. ज्यामध्ये सुसज्ज असे ऑडीटोरियम, विद्यार्थ्यांसाठी लायब्ररी, कॉम्प्युटर कक्षासह क्लासरूम ट्रेनिंग सेंटर येत्या वर्षभरात बांधण्यात येईल अशी माहिती अध्यक्ष सीए मयुर जैन आणि समिती सदस्य सीए कौशिक गडा यांनी दिली.यावेळी झालेल्या कार्यक्रमाला कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे, केडीएमसीचे माजी विरोधी पक्षनेते मंदार हळबे, शिवसेना शहरप्रमुख रवी पाटील,माजी नागरसेवक अरविंद मोरे, संजय पाटील, जयवंत भोईर, गणेश जाधव, सेंट्रल कौन्सिल मेंबर सीए मंगेश किनरे, सीए प्रिती सावला, पियूष छाजेड यांच्यासह कल्याण डोंबिवली ब्रँचचे अध्यक्ष सीए मयूर जैन, उपाध्यक्ष राकेश अग्रवाल, सचिव अमित मोहरे,खजिनदार विकास कामरा, ब्रँच नॉमिनी अंकित अग्रवाल, मूर्तुझा काचवाला यांच्यासह सीए रोशनी भावनानी, गिरीश तारवानी, पराग प्रभुदेसाई, प्रदीप मेहता, कौशिक गडा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# मुरबाड ऐतिहासिक म्हसा यात्रेत शासनाकडून मिळणाऱ्या यात्रा अनुदानात वाढ करण्याची ग्रामपंचायतची मागणी !



**मुरबाड (आकाश कांबळे)** - ठाणे जिल्हा सह राज्यभरात मुरबाड तालुक्यातील ऐतिहासिक म्हसोबा यात्रा प्रसिद्ध यात्रा म्हणून गणली जात आहे. यात्रेमध्ये जवळपास आता पर्यंत सात ते आठ दिवसात आठ ते नऊ लाख भक्त भाविकांनी दर्शन घेतले आहे. तसेच सुपरस्टार ऑल सोशल मीडिया वेल्फेअर फाउंडेशन पत्रकार संघटना संस्थापक अध्यक्ष तथा महाराष्ट्र शासन अधिस्वीकृती पत्रकार बाळासाहेब भालेराव यांनी ग्रामपंचायत म्हसा कार्याला भेट दिले असता ग्रामपंचायत वतीने सरपंच जया घागस ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी टोहके यांनी त्यांचा फुल गुच्छ देऊन सत्कार केला.यात्रेत म्हसा ग्रामपंचायत भक्त भाविकांच्या स्वागतासाठी सज्ज झाली आहे यात्रेमध्ये येणाऱ्या व जाणाऱ्या सर्व भक्त भाविकांना विविध सुविधा पुरविल्या जातात. त्यामध्ये टिशेल पावडर, बोरिंगचे पिण्याचे पाणी, सीसीटीव्ही कॅमेरे, आरोग्य सेवा, सेल्फी कॅमेरा, यांच्यासह अनेक प्रकारच्या सुविधा म्हसा ग्रामपंचायत मार्फत राबविला जात आहेत. परंतु शासनाकडून दरवर्षी यात्रेसाठी मिळणारा यात्रा अनुदान हे पाच लाखापर्यंत आहे परंतु हे पाच लाख सुद्धा यात्रा संपल्यानंतर दोन ते तीन टप्प्यात मिळत असतात परंतु मिळणाऱ्या पाच लाख यात्रा अनुदानातून यात्रेमध्ये ग्रामपंचायतला ते कमी पडत आहे कारण यात्रेमध्ये म्हसा ग्रामपंचायत मार्फत विविध प्रकारचे सुविधा उपलब्ध केले जातात त्यांना खर्च जास्त येत असतो परंतु यात्रेकरूंना धुळीचा त्रास होऊ नये यासाठी दररोज सात ते आठ टँकरद्वारे दररोज पाणी मारला जातो त्यासाठी एक लाखाचा खर्च अपेक्षित आहे इतर खर्चही मोठ्या प्रमाणात होत असतो म्हणून शासनाने यात्रा अनुदानात पाच लाख ऐवजी पंधरा ते वीस लाख रूपयांचा यात्रा अनुदान वाढवावा अशी माहिती सरपंच जया घागस, ग्रामपंचायत अधिकारी शिवाजी टोहके यांनी पत्रकारांची बोलताना दिली आहे.

यंदाची यात्रा पारदर्शक पद्धतीने पार पडत आहे

यात्रेत मोठ्या प्रमाणात भक्त भाविक दाखल होताना दिसत आहेत.

दरवर्षी शासनाकडून मिळणारा यात्रा अनुदान,,म्हसा ग्रामपंचायत साठी कमी पडत आहे,,तो पंधरा ते वीस लाखापर्यंत वाढवावा.

**जया घागस**

**सरपंच म्हसा ग्रामपंचायत**

# आरटीईसाठी आठवड्याभरात १० हजार अर्ज प्राप्त




**ठाणे (सम्यक कासारे)** – शिक्षण हक्क कायदा (आरटीई) अंतर्गत होणाऱ्या २५ टक्के जागांवरील प्रवेश प्रक्रियेला १४ जानेवारी पासून सुरुवात झाली. आरटीईच्या अधिकृत संकेतस्थळावरुन प्राप्त झालेल्या अहवालानुसार गेल्या आठवड्याभरात ठाणे जिल्ह्यातून १० हजार ५०६ अर्ज प्राप्त झाले आहेत. ११ हजार ३२० जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया पार पडणार आहे. पालकांना २७ जानेवारीपर्यंत आरटीईच्या संकेतस्थळावर आपल्या बालकाची नोंदणी करता येणार आहे, अशी माहिती ठाणे जिल्हा शिक्षण विभागाकडून देण्यात आली

समाजातील वंचित, दुर्बल आणि सामाजिक तसेच शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग घटकातील मुलांना खासगी विनाअनुदानित शाळांमध्ये शिक्षण घेता यावे याकरिता आरटीई कायद्या अंतर्गत २५ टक्के जागांवर प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येते. शैक्षणिक वर्षे २०२५ – २६ करिता आरटीई प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. यंदा ठाणे जिल्ह्यातील पंचायत समिती आणि महापालिका क्षेत्रातील ६२७ शाळा आरटीई प्रवेश प्रक्रियेसाठी पात्र ठरल्या असून ११ हजार ३२० जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया पार पडणार आहे. या प्रवेश प्रक्रियेसाठी १४ जानेवारी पासून अर्ज मागवण्यास सुरुवात झाली आहे. त्यानुसार, ठाणे जिल्ह्यातून आठवड्याभरात म्हणजे १४ जानेवारी ते २० जानेवारी पर्यंत १० हजार ५०६ अर्ज दाखल झाले असल्याची माहिती आरटीई संकेतस्थळावरुन प्राप्त झाली आहे. तरी, ज्या पालकांनी अद्याप अर्ज दाखल केलेले नाही त्यांनी २७ जानेवारी पर्यंत आरटीईच्या संकेतस्थळावर अर्ज दाखल करावा, असे आवाहन जिल्हा प्राथमिक विभागाचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

# कल्याणमध्ये एमडी ड्रग विकणाऱ्या इसमाला अटक

## कल्याण परिमंडळ ३ विशेष अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई



**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याणच्या खडकपाडा पोलीस स्टेशन हद्दीत आंबिवली येथील जाफर मनोज इराणी हा इसम गांधारी ब्रिज या ठिकाणी संशयस्पद आढळून आल्याने त्याच्या अंगझडती दरम्याने १० ग्राम वजनाचा अंदाजे ३१ हजार रुपये किमतीचा मेफाड्रोन (एमडी) हा पदार्थ विक्री करण्याच्या उद्देशाने स्वतः जवळ बाळगला असल्याचे मिळून आला. हि कारवाई पोनि शिवले, सपोनि गायकवाड, पोउपनि चव्हाण, पोलीस नाईक कसबे, पोलीस हवालदार जाधव, सोनवणे यांच्या पथकाने केली आहे. तर कल्याण परिमंडळ-३ मधील विविध पोलीसस्टेशन अंतर्गत मोकळी मैदानी,निर्जनस्थळे व रोडवरील आस्थापना यांच्यावर पोलिसांतर्फे धडक कारवाई सुरु असून शनिवार रविवार रात्री विहित वेळेपेक्षा सुरू असलेल्या आस्थापनावर एकूण ७३ कारवाई तसेच उघड्यावर व निर्जस्थळी नशेखोरांवर एकूण १६८ कारवाई करण्यात आली. अशा एकुण २४१ कारवाई करण्यात आल्या आहे. तसेच रोडवरील अती वेगाने मोटार सायकल चालवणे आणि ट्रिपल सीट वाहन चालवणे २६९ करवाई अशा प्रकारे एकूण ५१० कारवाई करण्यात आली असून पोलिसांची अशीच धडक कारवाई मोहिम यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिली.

# डोंबिवली पश्चिमेतील देवीचापदा येथील जुगार आणि गांजाच्या अड्ड्यांमुळे नागरिक अतिशय त्रस्त




**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण)–** डोंबिवली पश्चिमेतील देवीचापाडा येथील सत्यवान चौकातील जुगार अड्डा आणि देवीचापाडा येथील खाडी किनारच्या जेट्टीवर गांजा सेवन करणाऱ्यांच्या अड्ड्यांमुळे स्थानिक रहिवाशांबरोबर शहरातून खाडी किनारी फिरण्यास येणाऱ्या नागरिकांना सर्वाधिक त्रास होत आहे. महिलांना जीव मुठीत घेऊन या भागात फिरावे लागते.

पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांच्या आदेशावरून गैरकृत्यांविरुध्द जोरदार मोहीम सुरू असताना विष्णुनगर पोलीस ठाणे हद्दीतील देवीचापाडा येथील सत्यवान चौकात एक जुगार अड्डा २४ तास सुरू आहे. हा अड्डा सत्यवान चौकातील खंडोबा मंदिर समोरील महालक्ष्मी सुपर मार्केट जवळ आणि दत्तु साई इमारतीजवळ गल्लीत असलेल्या एका मोडक्या चाळीत सुरू आहे. या जुगार खेळणाऱ्यांची वाहने मुख्य रस्त्यावर उभी केलेली असतात. त्यामुळे पादचारी, वाहन चालकांना त्यांचा त्रास होतो. स्थानिक रहिवासी या जुगार अड्ड्यामुळे त्रस्त आहेत.

या जुगार अड्ड्यावर येणारे बहुतांशी खेळगडी हे यापुर्वीचे गुन्हेगार, तडीपार गटातील असल्याचे स्थानिक रहिवाशांनी सांगितले. याविषयी उघड बोलले तर जुगार अड्डा चालक त्रास देतील या भीतीने उघडपणे कोणीही रहिवासी याविषयी बोलत नाही. या चाळीवर पोलिसांची धाड पडली तर पाठीमागून पळण्यासाठी चाळीतून एक चोर वाट एका इमारतीच्या आवारातून ठेवण्यात आली आहे, अशी माहिती प्रत्यक्षदर्शींनी दिली. सकाळपासून ते रात्री उशिरापर्यंत अड्डा सुरू असतो, असे देवीचापाडा भागातील रहिवाशांनी सांगितले.तसेच, देवीचापाडा खाडी किनारच्या गणेशघाट विसर्जन जेट्टीवर गांजा सेवन करणाऱ्यांच्या झुंडी दररोज दुपारी दोन नंतर दाखल होतात. रात्री उशिरापर्यंत ते जेट्टीच्या बाजुला अंत्यविधी कार्यासाठी बांधण्यात आलेल्या निवाऱ्यात, बाजुच्या खारफुटीच्या झाडांखाली गांजा सेवन करत बसलेले असतात.

# ठाणे पालिकेने काढली ग्रंथ दिंडी; मराठी भाषा संवर्धन पंधरावड्यानिमित्ताने पालिकेचा उपक्रम





**ठाणे (रोहित जैसवार) :** मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने ठाणे महापालिकेच्यावतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून त्यानुसार, सोमवारी सकाळी पालिकेने शहरात ग्रंथ दिंडी काढली होती. ग्रंथ दिंडीनंतर महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी पालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित केलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन केले.

ठाणे महापालिका मुख्यालयासमोरील चौकापासून ग्रंथ दिंडीला सुरुवात झाली. परमार्थ निकेतन, ज्ञानराज मंदिरमार्गे पुन्हा महापालिका मुख्यालय प्रांगण अशी हि दिंडी काढण्यात आली. लेझिम, ढोल-ताशाच्या गजरात निघालेल्या दिंडीत अतिरिक्त आयुक्तसंदीप माळवी, प्रशांत रोडे, उपायुक्त जी. जी. गोदापुरे, उमेश बिरारी, अनघा कदम, मिताली संचेती, मनोहर बोडके, दिनेश तायडे, शंकर पाटोळे, सचिन सांगळे, टीएमटीचे व्यवस्थापक भालचंद्र बेहरे यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकारी, विभाग प्रमुख, महापालिका कर्मचारी हे पारंपारिक वेशभूषेत सहभागी झाले होते. फुलांनी सजवलेल्या पालखीत ज्ञानेश्वरी, भारताचे संविधान यांच्यासह वि. स. खांडेकर, वि. वा. शिरवाडकर, विंदा करंदीकर आणि भालचंद्र नेमाडे या ज्ञानपीठ पुरस्कार विजेत्या लेखकांचे साहित्य ठेवण्यात आले होते. मुख्यालयात दिंडी आल्यानंतर महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझिम नृत्य सादर केले.

ग्रंथदिंडी विसर्जित झाल्यानंतर पालिका मुख्यालयातील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी भाषा संवर्धनासाठी हा मराठी भाषेचा पंधरावडा आयोजित करण्यात आला आहे. त्यानिमित्ताने महापालिकेने विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. त्यापैकी ग्रंथ दिंडी आणि ग्रंथ प्रदर्शन सोमवारी आयोजित करण्यात आले. हे प्रदर्शन आणि पुस्तक विक्री मंगळवार, २१ जानेवारी रोजी सुरू राहणार आहे.

# केडीएमसी शाळांची सुरक्षा सी.सी.टी.व्ही.च्या निगराणीत



**कल्याण (विशाल पाटील) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त डॉ.इंदू राणी जाखड यांच्या निर्देशानुसार महापालिका शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेकरिता महानगरपालिकेच्या एकूण ६१ शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचा निर्णय घेण्यात आला असून या शाळांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम तात्काळ सुरू करण्यात आलेले आहे. शासन निर्णयानुसार खाजगी, शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे आदेश निर्गमित करण्यात आलेले होते, त्या अनुषंगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने तात्काळ सर्व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करून सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम हाती घेतले असून फेब्रुवारी २०२५ अखेरीस महापालिकेच्या सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. शासन निर्णयानुसार शाळेतील सीसीटीव्ही यंत्रणेची ठराविक अंतराने फुटेज तपासणी व काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास त्यावर कार्यवाही करण्याची जबाबदारी विशेषत्वाने मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीची असणार आहे. मुख्याध्यापकांनी आठवड्यातून किमान तीन वेळा फुटेज तपासणी करणे आवश्यक राहील.

# अजिंठा - वेरूळ चित्रपट महोत्सवाचा समारोप, सर्वोत्कृष्ट भारतीय चित्रपट कोणता ?

जगभरातील सर्वोत्कृष्ट चित्रपट मराठवाड्यातील रसिकांपर्यंत पोहोचवणाऱ्या दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट (AIFF) महोत्सवाचा समारोप समारंभ मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रोझोन मॉल येथे संपन्न झाला. यावेळी दिग्दर्शक फराह खान यांनी उपस्थितांशी संवाद साधला. ऑस्कर विजेता साऊंड डिझाईनर पद्मश्री रसूल पूकुट्टी उपस्थित होते. इतर मान्यवरांनी देखीले सोहळ्याला उपस्थिती लावली.

महोत्सवातील यंदाचे सुवर्ण कैलास पारितोषिक 'शांतीनिकेतन' या चित्रपटास प्रदान करण्यात आले. चित्रपटाचे दिग्दर्शक दिपांकर प्रकाश यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अभिनेत्री, निर्माती, दिग्दर्शक, नृत्य दिग्दर्शक फराह खान यांचा मास्टरक्लास'मध्ये प्रेक्षकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल. दिग्दर्शक मोहम्मद रसुल यांचा 'दि सिड ऑफ दि सॅक्रीड फिग' हा सिनेमा महोत्सवाची समारोप फिल्म म्हणून आली.

पारितोषिक विजेत्या चित्रपटांची आणि व्यक्तींची यादी

(१) सुवर्ण कैलास पारितोषिक (सर्वोत्त्कृष्ट भारतीय चित्रपट) : शांतीनिकेतन

दिग्दर्शक – दिपांकर प्रकाश

स्वरूप : १ लक्ष रुपये आणि सुवर्ण कैलास स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र

(२) रौप्य कैलास पारितोषिक (सर्वोत्त्कृष्ट अभिनेता - भारतीय




चित्रपट ) : नीरज सैदावत

चित्रपट: शांती निकेतन | दिग्दर्शक: दीपांकर प्रकाश

स्वरूप : २५००० रुपये आणि रौप्य कैलास स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र

(३) रौप्य कैलास पारितोषिक (सर्वोत्त्कृष्ट अभिनेत्री - भारतीय चित्रपट ) : भनिता दास

चित्रपट: विलेज रॉकस्टार्स २ | दिग्दर्शक: रीमा दास

स्वरूप : २५००० रुपये आणि रौप्य कैलास स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र

(४) रौप्य कैलास पारितोषिक (सर्वोत्त्कृष्ट पटकथा - भारतीय चित्रपट ) : सुभद्रा महाजन

चित्रपट: सेकंड चान्स

स्वरूप : २५००० रुपये आणि रौप्य कैलास स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र

(५) स्पेशल ज्यूरी मेन्शन (चित्रपट ) : विलेज रॉकस्टार्स २

दिग्दर्शक: रीमा दास

(६) स्पेशल ज्यूरी मेन्शन (अभिनेत्री) : नंदा यादव

चित्रपट: शांती निकेतन | दिग्दर्शक: दीपांकर प्रकाश

(७) बेस्ट शॉर्ट फिल्म (मराठवाडा स्पर्धा) :ठोकळा

दिग्दर्शक: वैभव निर्गुट

स्वरूप : २५००० रुपये आणि रौप्य कैलास स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र

(८) एमजीएम शॉर्ट फिल्म स्पर्धा (बेस्ट शॉर्ट फिल्म ) : जाणीव

दिग्दर्शक: स्वप्नील सरोदे

स्वरूप : २५००० रुपये आणि रौप्य कैलास स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र

(९) फ्रिप्रेसी इंडिया अवॉर्ड (सर्वोत्त्कृष्ट चित्रपट ) : इन दि आर्मस ऑफ दि ट्री

दिग्दर्शक – बबाक खाजेपाशा

(१०) ऑडियन्स चॉईस अवॉर्ड (सर्वोत्त्कृष्ट चित्रपट ) : सवाना अँड द माउंटन

दिग्दर्शक: पाओलो कार्नेरो

महोत्सवात दिग्दर्शक फराह खान म्हणाल्या, "आज मला या महोत्सवात सहभागी होऊन मनस्वी आनंद झाला आहे. हा महोत्सव मराठवाड्यात अत्यंत तळमळीने आयोजित केला जात असून या माध्यामतून या भागातील कलाकारांना एक व्यासपीठ मिळाले आहे.




## एजे आणि लीलाची पहिली मकरसंक्रांत

झी मराठी ही वाहिनी नेहमीच वेगवेगळ्या मालिकांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. सध्या या वाहिनीवरील 'नवरी मिळे हिटलरला' या मालिकेत एक रंजक वळण आलं आहे. 'नवरी मिळे हिटलरला' मालिकेत एजे आणि लीलाची पहिली मकरसंक्रांत साजरी होत आहे. त्या आधी एजेने, लीलासाठी खास पाणीपुरी तयार केली होती. एजे लिला सोबत एका खास ठिकाणी आहे जिथे एजेची मन्याशी पहिल्यांदा भेट होते. मन्या अनपेक्षितपणे एजेच्या घरी येतो, ज्यामुळे एजे थक्क होतो. मन्याने दिलेली आईस्क्रीम लीला खात आहे, पण त्यामागील त्याच्या खऱ्या हेतूंची तिला कल्पना नाहीये. लिला आजारी असताना एजे तिची काळजी घेतोय, तिच्यासाठी मकरसंक्रांतसाठी हलव्याचे दागिने स्वतः बनवतोय. एजेच्या काळजीने लीला भावूक होते, पण लीलाची अपेक्षा आहे की एजे आपले मन मोकळं करेल. मकरसंक्रांती निमित्ताने मालिकेत पतंग स्पर्धा रंगणार आहे.

हा सीन बद्दल शूट करताना लीला म्हणजेच वल्लरी विराजने काही सीन मागचे किस्से सांगितले , " या स्पर्धेत मी आणि एजे वेगळ्या टीम मध्ये होतो. सीन शूट केला तेव्हा खूप मज्जा केली. आम्ही सगळ्यांनी मिळून डांस केला, सगळे काळ्या कपड्यांमध्ये होतो, हलव्याचे दागिने घालून फोटोशूट केलं. हळदी- कुंकू केलं आणि मी एजे एक खास शेफ कॅप बनवली ज्यात हलव्याचे दागिने लावले होते. आम्ही तीळगूळ वाटले एक्दम मस्त वातावरण होते सेटवर. मकरसंक्रांत सीन मध्ये आमच्या घरचा खास सदस्य म्हणजे टायगर ही सामील झाला होता. तसं त्याच खरं नाव शेरू आहे, तो खूप गुणी कुत्रा आहे. आम्ही जेव्हा फोटोस घेते होतो तेव्हा तो माझ्या बाजूला येऊन बसला आणि तो इतकं सहकार्य करतो कि त्याच्यामुळे आम्हाला एक ही रिटेक घ्यावा लागला नाही. त्यांनी पटापट आपले शॉट्स दिले. एकदम उत्साहात आमचा मकरसंक्रांत सण साजरा झाला. हे भाग प्रेक्षकांना पाहायला नक्की मज्जा येणार आहे."

## गायक दर्शन रावलनं बेस्ट फ्रेंडसोबत गुपचुप केलं लग्न



बॉलिवूड चित्रपटांमध्ये आपल्या आवाजाची जादू दाखवणारे गायक दर्शन रावल लग्नबंधनात अडकला आहे. त्याच्या लग्नाचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. त्यानं आपली गर्लफ्रेंड धरल सुरेलियाबरोबर लग्न केलंय. हे दोघेही अनेक वर्षांपासून एकमेकांना डेट करत होते. धरल त्याची सर्वात चांगली मैत्रीण आहे. दर्शननं त्याच्या सोशल मीडिया अकाउंटवर त्याच्या लग्नाबद्दलची आनंदाची बातमी शेअर केली आहे. आता त्याच्या पोस्टवर अनेकजण कमेंट्स करू प्रतिक्रिया देत त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करत आहेत. व्हायरल झालेल्या फोटोमध्ये हे नवविवाहित जोडपे खूप सुंदर दिसत आहे.


लग्नाच्या या खास प्रसंगी दर्शन आणि त्याची पत्नी धरल सुरेलिया यांनी सुंदर पोशाख परिधान केला होता. लाल रंगाच्या लेहेंग्यामध्ये धरल खूप सुंदर दिसत आहे. या लेहेंग्यावर सुंदर भरतकाम केलं आहे. लूकला आणखी सुंदर बनविण्यासाठी धरलनं दोन दुपट्टे यावर घेतले आहेत. दुसरीकडे दर्शन रावलनं आयवरी रंगाच्या चिकनकारी शेरवानी परिधान केली आहे. एका फोटोमध्ये, दर्शन मंडपात त्याची वधू धरलच्या हातती किस घेताना दिसत आहे.

तुम्ही सर्वजण दर्शनच्या पत्नीबद्दल जाणून घेऊ इच्छित असणार, तर दर्शनची पत्नी धरल सुरेलिया एक आर्किटेक्ट आणि डिझायनर आहे. धरलनं बॅबसन कॉलेजमधून आपले शिक्षण पूर्ण केलं आहे. त्यानंतर तिनं एंटरप्रेन्योरशिप में एम.एससीची डिग्री पदवी प्राप्त केली. ती बटर कॉन्सेप्ट्स नावाच्या डिझाइन फर्मची संस्थापक देखील आहे.

## जीवघेण्या आजारपणानंतर अभिनेते विद्याधर जोशी उर्फ बाप्पा जोशी यांचं कमबॅक!

'स्टार प्रवाह'च्या 'अबोली' मालिकेत काही दिवसांपूर्वीच जान्हवी किल्लेकर आणि मयुरी वाघ या दोन लोकप्रिय अभिनेत्रींची एन्ट्री झाली होती. आता या पाठोपाठ आणखी एका मालिकेत लोकप्रिय अभिनेते एन्ट्री घेणार आहेत. रात्री उशिरा प्रसारित होत असली तरीही, 'स्टार प्रवाह'च्या 'येडं लागलं प्रेमाचं' मालिकेला प्रेक्षकांचं भरभरुन प्रेम मिळत आहे. लवकरच मालिकेत अभिनेते विद्याधर जोशी उर्फ बाप्पा जोशी यांचं आगमन होणार आहे. नाटक, मालिका, चित्रपट अशा तिन्ही क्षेत्रांमध्ये त्यांनी आपल्या दमदार अभिनयाचा ठसा उमटवला आहे. उमाच्या भावाची म्हणजेच बाळामामाची भूमिका ते साकारणार आहेत.

जीजी म्हणजेच उमाचा हा भाऊ आयुर्वेदिक औषधांचा जुना जाणकार असून मंजिरीचा जीव धोक्यात असताना तिच्यावर औषधोपचार करण्यासाठी



बाळामामा पंढरपूरात आले आहेत. वृत्तीने कर्मठ, अभिमानी, परखड आणि स्पष्टवक्ते असलेल्या बाळामामाला समाजात प्रचंड आदराचं स्थान आहे. उमाला तू चुकते आहेस असं तोंडावर सांगू शकणारा बाळामामा तेवढाच लाघवी आणि प्रेमळ आहे.

बाळामामाची व्यक्तिरेखा साकारणारे अभिनेते विद्याधर जोशी जीवघेण्या आजारावर मात करुन जवळपास २ वर्षांनंतर पुन्हा एकदा कलाक्षेत्रात आपली जादू दाखवण्यासाठी सज्ज झाले आहेत. ते मधल्या काळात लंग्ज फायब्रोसिस या आजाराने ग्रस्त होते. यानंतर त्यांच्यावर फुफ्फस प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली. आजारपणामधून बरे होऊन विद्याधर जोशी आता पुन्हा एकदा छोट्या पडद्याकडे वळत आहेत. अनेक मालिका, नाटक आणि चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं भरभरुन मनोरंजन करणारे सर्वांचे लाडके बाप्पा जोशी आता 'येड लागलं प्रेमाचं' मालिकेच्या माध्यमातून एका नव्या रुपात प्रेक्षकांच्या भेटीला येतील.

विद्याधर जोशी या भूमिकेविषयी सांगताना म्हणाले, "दोन वर्षांनंतर आवडीचं काम करताना मला अतिशय आनंद होतोय. मनाला आतून उभारी येतेय असं वाटतं. माझ्या नशिबाने सेटवरची सगळीच मंडळी माझी काळजी घेत शूटिंग करत आहेत. 'स्टार प्रवाह'चे बिझनेस हेड सतीश राजवाडे यांनी देखील प्रचंड मानसिक आधार दिला. गेली दोन ते अडीच वर्षे आजारपणामुळे मी अभिनय क्षेत्रापासून लांब होतो. मात्र, आता माझी प्रकृती उत्तम आहे. प्रेक्षकांच्या प्रेमामुळेच मी पुन्हा एकदा नव्या जोमाने कामाला सुरुवात करत आहे. 'येड लागलं प्रेमाचं' मालिकेतला बाळा मामा प्रेक्षकांना नक्की आवडेल याची खात्री आहे.

दरम्यान, 'येडं लागलं प्रेमाचं' ही मालिका 'स्टार प्रवाह' वाहिनीवर रोज रात्री १० वाजता प्रसारित केली जाते. यामध्ये पूजा बिरारी ( मंजिरी ), विशाल निकम ( राया ) यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

## 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला रामराम केल्यानंतर तेजश्री प्रधान 'या' आश्रमात घालवतेय दिवस, वासराबरोबरचा फोटो शेअर करत म्हणाली...



अभिनेत्री तेजश्री प्रधानने आपल्या सहजसुंदर अभिनयाने मराठी सिनेसृष्टीत स्वतंत्र स्थान निर्माण केलं आहे. त्यामुळे तेजश्रीचा मोठा चाहता वर्ग आहे. पण काही दिवसांपूर्वी तेजश्रीने चाहत्यांना धक्का बसणारा निर्णय घेतला. लोकप्रियतेच्या शिखरावर असणारी मालिका 'प्रेमाची गोष्ट'मधून तिने एक्झिट घेतली. ही बातमी समोर येताच चाहत्यांमध्ये नाराजीचे सूर उमटले. "तू प्रेमाची गोष्ट सोडू नको", "तू असं का करत आहेस?", "तुझ्यामुळेच आम्ही 'प्रेमाची गोष्ट' मालिका पाहत होतो", "तुझ्याशिवाय 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला मज्जा नाही", अशा प्रतिक्रियांचा पाऊस सोशल मीडियावर पडला. अजूनही याबाबत चर्चा सुरू आहे. अचानक तेजश्रीने मालिका का सोडली? यामागचं नेमकं कारण काय? असे अनेक प्रश्न उपस्थित राहिले आहेत. पण, मालिका सोडल्यानंतर तेजश्री सध्या काय करते? हे तुम्हाला माहितीये का?

अभिनेत्री तेजश्री प्रधानने 'प्रेमाची गोष्ट' मालिका सोडल्याचं स्वतः जाहीर केलं नव्हतं. पण मालिका सोडल्याची बातमी येताच तिने सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली; ज्यामुळे तिने 'प्रेमाची गोष्ट' मालिकेला रामराम केल्याचं निश्चित झालं. "चिअर्स...काही वेळेला बाहेर पडणं गरजेचं असतं. तुमची कुवत जाणून घ्या आणि तुमच्या अस्तित्वाचा आदर करा. कारण हे तुमच्यासाठी कोणीही करणार नाही," असं तेजश्रीने पोस्टमध्ये लिहिलं होतं. तिची ही पोस्ट खूप व्हायरल झाली होती. त्यानंतर नुकत्याच तिने इन्स्टाग्रामवर दोन स्टोरी शेअर केल्या आहेत. ज्यामधून ती सध्या काय करते? हे समोर आलं आहे.

तेजश्री प्रधानने प्राजक्ता माळीच्या पावलावर पाऊल ठेवलं आहे. प्राजक्ता माळीचे गुरु श्री श्री रविशंकर आहेत, जे आता सर्वश्रुत आहे. याच श्री श्री रविशंकर यांच्या आश्रमात तेजश्री सध्या वास्तव्यास आहे. याच आश्रमातील जेवणाच्या ताटाचा फोटो तिने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. या जेवणाच्या ताटात वरण-भात, पापड, भाजी, असे काही पदार्थ पाहायला मिळत आहे.

## मानेच्या चरबीमुळे श्वासोच्छवासाचा त्रास कसा होतो?

मानेच्या चरबीमुळे ऑब्स्ट्रक्टिव्ह स्लीप एपनिया (OSA) होऊ शकतो. या स्थितीत मानेभोवती अतिरिक्त चरबी झोपेच्या वेळी वरच्या वायुमार्गाला अरुंद करून श्वासोच्छवासाच्या मार्गात अडथळा आणू शकते, ज्यामुळे अधूनमधून श्वासोच्छवास थांबतो. काही प्रकरणांमध्ये, मानेची जास्त चरबी फुफ्फुसांच्या विस्ताराच्या यांत्रिक प्रतिबंधातदेखील योगदान देऊ शकते, जरी हे OSA पेक्षा कमी सामान्य आहे.

**हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी गुंतागूंत :** OSA आणि इतर झोपेच्या विस्कळीत श्वासोच्छवासाच्या परिस्थिती उच्च रक्तदाब, हृदयरोग, स्ट्रोक आणि टाइप २ मधुमेहाच्या वाढीव जोखमीशी संबंधित आहेत.

**संज्ञानात्मक कमजोरी :** OSA मुळे झोपेची कमतरता व त्यामुळे दिवसभराचा थकवा, लक्ष केंद्रित करण्यात अडचण आणि मूड खराब होऊ शकतो.

**चयापचयाचा विकार :** लठ्ठपणा बहुतेकदा मानेच्या चरबीशी जोडलेला असतो, इन्सुलिन प्रतिरोध, टाइप २ मधुमेह आणि नॉन-अल्कोहोलिक फॅटी यकृत रोगाशी संबंधित असतो.

**मानेवरील चरबीचे व्यवस्थापन कसे करावे?**

**वजन व्यवस्थापन :** आहार आणि व्यायामाच्या संयोजनाद्वारे एकूणच वजन कमी करणे हे मानेची चरबी कमी करण्यासाठी प्रभावी ठरते.

**व्यायाम :** मानेच्या स्नायूंना लक्ष्य करणाऱ्या विशिष्ट व्यायामांचा चरबी कमी होण्यावर मर्यादित प्रभाव असू शकतो.

**जीवनशैलीत बदल :** मद्यपान कमी करणे, धूम्रपान सोडणे झोपेशी संबंधित श्वासोच्छवासाच्या समस्यांचे व्यवस्थापन करण्यात मदत करू शकते.

**वैद्यकीय हस्तक्षेप :** गंभीर प्रकरणांमध्ये सतत सकारात्मक वायुमार्ग दाब (CPAP) थेरपी किंवा शस्त्रक्रिया OSA उपचारांसाठी विचारात घेतली जाऊ शकते.

## मधुमेह झालेल्यांनी सकाळचा नाश्ता न केल्यास गंभीर आरोग्य समस्या उद्भवतात

मधुमेहींसाठी रक्तातील साखरेची पातळी राखण्यासाठी आणि संपूर्ण आरोग्य सुधारण्यासाठी सकाळचा नाश्ता करणं खूप फायदेशीर आहे. जर तुम्ही नाश्ता करत नसाल तर तुम्हाला शारीरिक आणि मानसिक समस्या निर्माण होऊ शकते, ज्यामुळे रक्तातील साखरेचे व्यवस्थापन गुंतागुंतीचे होते आणि दीर्घकालीन गुंतागूंत होण्याचा धोका वाढतो.

आहारतज्ज्ञ आणि मधुमेह शिक्षक कनिक्का मल्होत्रा सांगतात की, सकाळी ऑफिसला जाण्याची गडबड आणि डाएट करण्याचा ट्रेंड असूनही नाश्त्याचे महत्त्व समजून घेणे सुदृढ आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे.

**रक्तातील साखर नियंत्रण व्यत्यय**

नाश्ता वगळल्याने दिवसानंतर रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते किंवा हायपरग्लायसेमिया होऊ शकतो. कारण शरीर रात्रभर दीर्घकाळ उपवास करते. जेव्हा सकाळचा नाश्ता चुकतो तेव्हा त्यानंतरचे जेवण अधिक मजबूत ग्लुकोज प्रतिसादास उत्तेजन देऊ शकते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. कालांतराने हा पॅटर्न ग्लायसेमिक परिवर्तनशीलता



वाढवतो.

**इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता वाढणे**

इन्सुलिन प्रतिरोध टाइप २ मधुमेहाचे वैशिष्ट्य आहे. मल्होत्रा म्हणाले की, न्याहारी वगळल्याने इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता वाढू शकते, ज्यामुळे ग्लुकोजचे नियमन आणखी आव्हानात्मक होते. ही स्थिती कायम राहिल्यास मधुमेहाच्या प्रगतीला गती देऊ शकते आणि हृदयरोगासारख्या आरोग्य समस्या उद्भवू शकतात.

**दीर्घकालीन आरोग्य जोखीम**

मल्होत्रा यांच्या मते, नियमितपणे नाश्ता न केल्याने त्याचे व्यापक परिणाम होतात. दीर्घकाळ उच्च रक्तातील साखरेची पातळी धोका वाढवते. तसेच प्री-डायबेटिक व्यक्तींसाठी नाश्ता वगळल्याने टाइप २ मधुमेहाचा धोका जलद गतीने वाढू शकतो.

**पोषण आणि चयापचय असंतुलन**

नाश्ता फायबर, प्रथिने आणि निरोगी चरबी यांसारख्या पोषक तत्वांचा वापर करण्याची एक महत्त्वाची संधी प्रदान करते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी स्थिर होते, असे मल्होत्रा यांनी सांगितले. नाश्ता वगळण्यामुळे दुपारचे जेवण जास्त प्रमाणात खाल्ले जाते, ज्यामुळे तुमचे वजन वाढू शकते.

**मानसिक प्रभाव**

मल्होत्रा यांच्या मते, नाश्ता न केल्याने शरीरावरच नाही तर मानसिक आरोग्यावरही प्रभाव पडू शकतो.

**भूक वाढते :** जास्त खाणे किंवा चिप्स, शेव, बिस्कीट असे स्नॅक्स खाणे.

चिडचिड होणे : नाश्ता न केल्याने तुमची चिडचिड होऊ शकते.




**मेष** – गुंतवणुकीसाठी मार्ग सापडेल. आवडीनिवडीबाबत आग्रही राहाल. ओळखी होतील. वरिष्ठांच्या सल्ल्याशिवाय पुढे जाऊ नका.

**वृषभ** – जुनी रखडलेली कामे पूर्ण होतील. मेहनतीचे चीज होईल. वरिष्ठांचा पाठिंबा मिळेल. आळस करू नका. आहारावर नियंत्रण ठेवा.

**मिथुन** – उत्तम वैचारिक भूमिका घ्याल. आशावादी दृष्टिकोन कायम ठेवाल. नवीन शिकण्याची संधी सोडू नका. आपले मन अस्थिर होईल.

**कर्क** – तुमचे महत्त्व वाढेल. आपणास मान-सन्मान मिळेल. कला-क्रीडा स्पर्धेत यशस्वी व्हाल. आपल्यामुळे इतरांची गैरसोय टाळावी.

**सिंह** – तुमच्या कार्याला योग्य गती मिळेल. अतिअपेक्षा बाळगू नका. मानसिक समतोल साधावा. कोणतेही साहस करताना सतर्क राहावे.

**कन्या** – वैवाहिक जीवन आनंदी असेल. व्यवसायात प्रगती करता येईल. हट्टीपणाचा कळस करू नका. कधीही दुसऱ्याला कमी लेखू नका.

**तूळ** – जोडीदाराच्या सल्ल्याने कृती कराल. आपला बौद्धिक कस लागू शकतो. जवळच्या प्रवासाचा योग येईल. कामाचा व्याप वाढू शकतो.

**वृश्चिक** – ठरवलेले काम पूर्ण कराल. नवीन ओळख उपयुक्त ठरेल. क्षुल्लक गोष्टींनी नाराज होऊ नका. योग्य संधीसाठी वेळ द्यावा लागेल.

**धनु** – हाती घेतलेले काम पूर्णत्वास जाईल. नम्रपणे तुमची भूमिका मांडाल. एखादी अडचण निर्माण होईल. बोलताना नेहमी भान राखावे.

**मकर** – घरासाठी खरेदी कराल. जोडीदाराचा सल्ला विचारात घ्यावा. गैरसमजुती मनातून काढाव्यात. खर्चाचा ताळमेळ बसवावा लागेल.

**कुंभ** – भावनेच्या आहारी न जाता व्यावहारिक निर्णय घ्याल. आपल्या कार्यक्षेत्रात प्रगती कराल. चारचौघांत कौतुकास पात्र व्हाल.

**मीन** – कला-क्रीडा-साहित्यात मोठे यश मिळेल. नव्या ओळखीच्या सहवासाने उत्साह वाढेल. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका.

# क्रेडाईने एसटी महामंडळाची जमीन विकसित करण्यासाठी योगदान द्यावे - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक



मुंबई (विशाल कारंडे) - एसटी महामंडळाच्या १३६० हेक्टर जमिनीचा विकास करण्यासाठी क्रेडाई (CREDAI) या संस्थेने आपले योगदान द्यावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे. परिवहन मंत्री श्री. सरनाईक यांनी " महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिंग इंडस्ट्रीज " ने आयोजित केलेल्या प्रदर्शनाला भेट दिली. त्याप्रसंगी मंत्री बोलत होते. मंत्री श्री. सरनाईक म्हणाले की , एसटी महामंडळाचे राज्यभरात ८४२ ठिकाणी १३६० हेक्टर जमीन उपलब्ध आहे. या जागांचे शहरी, निम-शहरी आणि ग्रामीण असे वर्गीकरण करण्यात आले आहे. बांधा वापरा आणि हस्तांतरित करा अथवा खाजगी सार्वजनिक भागीदारी तत्त्वावर या जमिनी विकसित करून तेथे एसटी महामंडळाला आवश्यक असलेली बसस्थानके, आगार आणि आस्थापना कार्यालय संबंधित विकासकाकडून बांधून घेण्यात यावीत. त्याचबरोबर जिल्ह्याच्या ठिकाणी किमान १०० खाटांचे अद्ययावत रुग्णालय, इलेक्ट्रिक बस चार्जिंग स्टेशन, रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि सोलर पॅनलसारखे पर्यावरण पूरक प्रकल्प उभारणे अपेक्षित आहे. या बदल्यात संबंधित विकासकाला त्या जमिनीवर त्याच्या सोयीनुसार व्यावसायिक क्षेत्र विकसित करता येईल. यासंदर्भातील सर्वसमावेशक धोरण लवकरच एसटी महामंडळ आणणार असून यासाठी सूचना आणि प्रस्ताव क्रेडाई यासारख्या देशातील रिअल इस्टेट क्षेत्रातील नामवंत संस्थेने द्यावेत, असे आवाहनही क्रेडाई मंत्री श्री. सरनाईक यांनी केले. याप्रसंगी क्रेडाईचे अध्यक्ष डॉमनिक रोमेल व इतर पदाधिकारी, विकासक, वास्तुविशारद उपस्थित होते.

# महिलेचा व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या आरोपीला अटक

**पुणे (शकील शेख) :** आंघोळ करतानाचे व्हिडिओ रेकॉर्ड करून सोशल मीडियावर व्हायरल करून, तो व्हिडिओ डिलीट करण्यासाठी पीडित महिलेकडे शरीर सुखाची आणि पैशांची मागणी करणाऱ्या आरोपीला वानवडी पोलिसांनी नाशिक येथून अटक केली आहे.कृष्णा संपत शिंदे वय २० रा.चव्हाण मळा नाशिक असे आरोपीचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही नाशिक येथे राहण्यास होती. तिचे लग्न झाल्यावर ती पुण्यात आली. नाशिक येथे पीडित महिला राहण्यास असताना आरोपी कृष्णा शिंदे याने पीडित महिला आंघोळ करीत असताना.



तो व्हिडिओ रेकॉर्ड केला आणि सोशल मीडियावर व्हायरल केला. या व्हिडिओ बाबत पीडित महिलेस माहीती झाली. त्यानंतर आरोपीला पीडित महिलेने जाब विचारत व्हिडिओ डिलीट करण्यास सांगितला. त्यावर आरोपी कृष्णा शिंदे याने पीडित महिलेकडे शरीर सुखाची मागणी किंवा ३० हजार रुपये रोख रकमेची मागणी केली.

या सर्व घडलेल्या प्रकाराबाबत पीडित महिलेने आमच्याकडे तक्रार दिली. त्यानुसार पोलिस अंमलदार अमोल पिलाने, अतुल गायकवाड यांनी तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर आरोपी कृष्णा शिंदे हा नाशिकमध्ये असल्याचे दिसून आले.

SPORT

# Mohammed Siraj's cryptic Instagram story goes viral after being dropped from India's Champions Trophy squad

**NEW DELHI :** India's star speedster Mohammed Siraj was unexpectedly dropped from the India's squad for the upcoming Champions Trophy 2025, which is set to start from February 20 in Pakistan and Dubai. Mohammed Siraj's absence left many surprised and perplexed. Meanwhile, the star pacer shared a cryptic post on his official Instagram account which is going viral on social media.

India's chief selector Ajit Agarkar along with captain Rohit Sharma via press conference announced India's 15-member Champions Trophy squad on January 18.

While the core of the team largely resembles the squad that competed in the 2023 World Cup, Siraj's absence is a notable change. He has been a prominent figure in India's One Day International (ODI) lineup in recent years, consistently delivering impactful and match-winning performances.

Following his exclusion from the Indian squad for the upcoming Champions Trophy, Mohammed Siraj shared a post on social media, igniting discussions among



cricket experts. On Monday, January 20th, the 30-year-old pacer took to his Instagram story, posting a picture from the gym accompanied by the caption 'reset, restart, refocus'.

Siraj boasts an impressive track record in ODIs, having claimed 71 wickets in just 44 appearances. He played a pivotal role in India's triumphant Asia Cup 2023 campaign, delivering a match-winning performance in the final against Sri Lanka with career-best figures of 6/21. This strong form continued into the ODI World Cup on home soil, where he contributed significantly with 14 wickets, helping India reach the final.

Despite leading the pace attack in the absence of key bowlers like Jasprit Bumrah and the recently returned Mohammed Shami, Siraj has surprisingly been overlooked for the Champions Trophy squad. He has been replaced by left-arm pacer Arshdeep Singh, who has limited ODI experience with only eight matches under his belt. This decision has raised eyebrows among cricket experts and fans alike.

Siraj will also be absent from the upcoming ODI series against England, which precedes the Champions Trophy. His most recent appearance for India was during the 2024-25 Border-Gavaskar Trophy, where he claimed an impressive 20 wickets. This performance placed him as the second-highest wicket-taker for India in the series, trailing only Jasprit Bumrah (32 wickets), and the fourth-highest overall.

Harshit Rana has been included in the Indian ODI squad for the England series as a backup for Jasprit Bumrah. Chief selector Ajit Agarkar has stated that Bumrah's inclusion in the playing XI will depend on his fitness. Notably, Siraj has been omitted from the squad, with India opting for Mohammed Shami and Arshdeep Singh as the other pacers. Siraj previously held the top spot in the ICC ODI Rankings from September 20 to November 14, 2023.Rohit Sharma (c), Shubman Gill (vc), Virat Kohli, Shreyas Iyer, KL Rahul, Hardik Pandya, Axar Patel, Washington Sundar, Kuldeep Yadav, Jasprit Bumrah, Mohammed Shami, Arshdeep Singh, Yashasvi Jaiswal, Rishabh Pant, Ravindra Jadeja

Rohit Sharma, Shubman Gill, Virat Kohli, Shreyas Iyer, KL Rahul, Hardik Pandya, Axar Patel, Washington Sundar, Kuldeep Yadav, Harshit Rana, Jasprit Bumrah, Mohammed Shami, Arshdeep Singh, Yashasvi Jaiswal, Rishabh Pant and Ravindra Jadeja

# Rohit Sharma urges Ravi Shastri to leave corner seat, sit in centre instead; remarkable gesture at Wankhede wins hearts

**NEW DELHI :** A host of Indian cricket legends from Mumbai assembled at the Wankhede Stadium on Sunday to celebrate the venue's 50th anniversary. The event featured a special segment where Mumbai's cricketing greats, past and present, shared their cherished memories of playing at the historic venue. Among the stalwarts invited to the stage were Sunil Gavaskar, Sachin Tendulkar, Ravi Shastri, Rohit Sharma, and Ajinkya Rahane, among others.



The seating arrangement on stage was divided into three sections: right, centre, and left. When Ravi Shastri took the stage, he chose a seat on the left. Moments later, Rohit Sharma arrived, and in a gesture that resonated with respect and warmth, the Indian captain requested Shastri to move to the centre seats, acknowledging his stature and contributions to Indian cricket.

Many on social media have since praised Rohit for his respectful gesture for Shastri; Rohit was one of the integral members of the Indian team under Shastri as head coach.

In the same event, Rohit also addressed the fans after being asked to send a parting message before the Champions Trophy. The Indian captain said that the team would try "everything they can" to "bring back the trophy" at the Wankhede Stadium.

When India won the T20 World Cup last year, the BCCI held victory celebrations at the same venue, with every member of the winning side taking part. An open-top bus parade en route to the stadium was also held across the Marine Drive, with fans attending it in large numbers.

**Rohit with Mumbai**

Rohit is currently training with the Mumbai state team following a disappointing tour of Australia, where he could score only 31 runs across five innings.

Rohit has been training with the white ball ahead of the limited-overs season, which sees India plaiying England in three ODIs before the Champions Trophy. The two teams will also play five T20Is before the fifty-over series; Rohit retired from the shortest format in 2024.

# 'He was playing with my emotions': Sachin Tendulkar's distraction during 'final wish' from BCCI; 'My eyes were moist'




**NEW DELHI :** The legendary Sachin Tendulkar's retirement and farewell match will go down as one of the most emotional moments in the history of world cricket. The sight of the Master Blaster struggling to hold back tears, being lifted on the shoulders of his teammates, returning to the pitch to pay his respects one final time, and quietly disappearing into the dressing room, never to return in India colours again, was enough to make grown men bawl. For almost a quarter of a century, Tendulkar had enthralled the cricket-crazy nation of India, and suddenly, it all came to an end, with the one and only Tendulkar riding into the sunset, bringing curtains down on an incomparable 24-year-long career. When Tendulkar's retirement was announced, Indian cricket fans had just one destination – Sachin's last two Test matches – 199th and 200th – in Kolkata and Mumbai. After Tendulkar was dismissed for 10 in the only innings India batted at the Eden Gardens, all eyes turned to Wankhede. As it turns out, the Master Blaster had requested the Board of Control for Cricket in India to organise his farewell Test at his home ground. Not for himself, not particularly for fans either, but for his mother, Rajni Tendulkar.

# 'One Week Before Retention Date...': Shreyas Iyer Breaks Silence On Why He Left Kolkata Knight Riders

**NEW DELHI :** Shreyas Iyer led Kolkata Knight Riders to the IPL 2024 title win, but despite that, he was not retained by the three-time IPL champions. KKR's decision to let go of Iyer came as a shock for many fans, and the player himself was also very disappointed with the development. According to him, there was a lack of communication from the franchise's part about the retention, and because of that, both parties failed to reach an agreement.

"Certainly, I had a fantastic time winning the championship at KKR. The fan following was outstanding; they were electrifying in the stadium, and I loved every moment I spent there. So obviously, we had a conversation (about retention) straight after the IPL championship. But for a few months, there was a layover and no concrete effort in having a retention talk. I was perplexed about what was happening. So, because of a lack of communication, we came to a situation



where we parted ways mutually. And that's the long and short of it," he was quoted as saying by Indian Express.

"Yes, obviously disappointed, because when you don't have a certain line of communication and if you get to know things one week prior to the retention date, then obviously something is lacking over there. So, I had to take a call. Whatever is written is supposed to happen," he added.

Iyer said he enjoyed his time with KKR during the three-year association with the franchise and was full of praise for the team owner, Shah Rukh Khan.

"I would just like to say that the time I spent over there (KKR) with Shah Rukh Sir, the family, and all of them was phenomenal. And obviously, winning the championship was probably an integral part of my life."

"We all know Shah Rukh sir; he's a heartthrob, and people go bonkers whenever they look at him. He's got this certain zest when he walks into the room, that energy, that vibration. And he's a dominant figure, obviously. I got to learn a lot from him. He is very kind and generous in nature. And probably that's what makes him pretty unique as an individual. I love his confidence level and self-belief about the team the most. It was surreal," he added.

After parting ways with KKR, the 30-year-old right-handed batter entered the mega auction and bagged a deal worth Rs 26.75 crore from Punjab Kings. The second most expensive player in IPL history was recently appointed as Punjab Kings captain as well.

# मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर बुधवारपासून तीन दिवसीय वाहतूक ब्लॉक



● मुंबई, राकेश गायकवाड :

यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गावर गर्डर अर्थात तुळई बसविण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यासाठी २२ जानेवारी, बुधवारपासून ते २४ जानेवारीपर्यंत दुपारी १२ ते ३ या वेळेत वाहतूक ब्लॉक घेण्यात येणार आहे. ब्लॉकच्या कालावधीत मुंबईहून पुण्याकडे जाणारी वाहतूक बंद राहणार असून ती इतर मार्गांवर वळवण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून (एमएसआरडीसी) महामार्गावरील मुंबई वाहिनीवरील किमी क्रम. ५८/५०० (डोंगरगाव/कुसगाव) येथे पूल बांधण्यात येत आहे. त्या पुलाची तुळई बसविण्यात येणार आहे. हे काम २२ ते २४ जानेवारीदरम्यान दुपारी १२ ते ३ या वेळेत केले जाणार आहे. त्यासाठी तीन तासांचा वाहतूक ब्लॉक जाहीर करण्यात आला आहे. ब्लॉक कालावधीत पुण्याहून मुंबईकडे जाणारी वाहतूक सुरळीत सुरु राहणार आहे. तीन तासांच्या वाहतूक ब्लॉकदरम्यान मुंबईहून पुण्याकडे जाणारी वाहतूक महामार्गाच्या पुणे वाहिनीवरील किमी क्र. ५४/७०० वळवण ते वरसोली टोलनाका येथून देहूरोडमार्गे पुण्याकडे वळविण्यात येणार आहे. दुपारी ३ नंतर मुंबई वाहिनीवरील मुंबईहून पुण्याकडे जाणारी वाहतूक सुरळीत राहील.

# रायगडला आदिती तटकरे तर नाशिकला गिरीश महाजन प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करणार !

● मुंबई, विशाल पाटील :



रायगड व नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदावरून वाद झाला असतानाच व या नियुक्तीला लागली स्थगिती दिली असताना पुन्हा एकदा रायगडला आदिती तटकरे तर नाशिकला गिरीश महाजन हेच प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहण करणार असल्याचे सामान्य प्रशासन विभागाने स्पष्ट केले आहे राज्यातील महायुती सरकारने १८जानेवारी रोजी राज्यातील पालकमंत्री पदाची यादी जाहीर केली होती या यादीवरून महायुती सरकार मधील शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्या वाद झाला या वादाची ठिणगी रायगड जिल्ह्यातील महाड येथे पडली शिंदे गटातील रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांनी रायगडच्या पालकमंत्री पदी नियुक्त झालेल्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या नियुक्तीला विरोध केला व१९ जानेवारीच्या रात्रीच्या सुमारास गोगावले समर्थकांनी आदिती तटकरे यांच्या व रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या निषेधार्थ घोषणाबाजी करून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील महाड जवळील नडगाव येथे रास्ता रोको करून टायर जाळून महामार्ग तब्बल दोन तास रोखला व दुसऱ्या दिवशी शिंदे गटाच्या नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी राजीनामा सूत्र चालू केले अखेर या वादामुळे राज्य शासनाने रायगड सह नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या नियुक्ती तात्पुरती स्थगिती देणारा अध्यादेश काढला रायगड व नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्री पदाचा वाद नियुक्ती द्वारे स्थगिती दिल्यानंतर २६ जानेवारीच्या प्रजासत्ताक दिनी रायगड येथे महिला व बालविकास मंत्री कुमारी आदिती तटकरे व नाशिक येथे गिरीश महाजन हे राष्ट्र ध्वजारोहण करतील अशा आशयाचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभागाने राज्याचे अववर सचिव सुनील सोनार यांच्या आदेशान्वये २० जानेवारी रोजी काढले आहे.

# देशाला पहिले खो-खो विश्वविजेतेपद जिंकून देणाऱ्या पुण्याचा प्रतिक वाईकर व बीडची प्रियांका इंगळे या कर्णधारांचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून अभिनंदन व विशेष कौतुक




● मुंबई, विशाल पाटील :

नवी दिल्लीत झालेली पहिली जागतिक अजिंक्यपद खो-खो स्पर्धा जिंकून विश्वविजेता ठरलेल्या भारताच्या पुरुष आणि महिला संघांतील खेळाडू तसेच संघ प्रशिक्षकांचे उपमुख्यमंत्री तथा महाराष्ट्र ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी अभिनंदन केले आहे. भारतीय पुरुष संघाचे नेतृत्व प्रतिक वाईकर आणि महिला संघाचे नेतृत्व प्रियांका इंगळे या महाराष्ट्राच्या खेळाडूंनी केले. विशेष म्हणजे प्रियांका मूळची बीड तर, प्रतिक हा पुणे जिल्ह्यातील आहे. योगायोग म्हणजे या दोन्ही जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद उपमुख्यमंत्री श्री.पवार यांच्याकडे असून या विश्वविजेत्या दोन्ही कर्णधारांचे त्यांनी विशेष कौतुक केले आहे. नवी दिल्लीत झालेल्या पहिल्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारताच्या पुरुष व महिला या दोन्ही संघांनी दमदार खेळ करत नेपाळवर एकतर्फी विजय मिळवला. विश्वविजेत्या भारतीय संघात कर्णधार प्रतीक वाईकर याच्यासह सुयश गरगटे, अनिकेत पोटे, आदित्य गनपुले व रामजी कश्यप या पाच महाराष्ट्राच्या खेळाडूंचा समावेश होता. तर विश्वविजेत्या महिला संघात कर्णधार प्रियांका इंगळे हिच्यासह कु. अश्विनी शिंदे, कु. रेश्मा राठोड, वैष्णवी पवार या महिला खेळाडू महाराष्ट्राच्या होत्या. या खेळाडूंसह पुरुष संघाचे प्रशिक्षक पुण्याचे शिरीन गोडबोले, महिला संघाच्या प्रशिक्षक पुण्याच्या प्राचीताई वाईकर तसेच फिजिओथेरेपिस्ट डॉ. अमित रावहाटे यांचेही उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी अभिनंदन केले असून भविष्यातील यशस्वी क्रीडा कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# डॉक्टर बलात्कार खून प्रकरण : संजय रॉयला जन्मठेप

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील डॉक्टर तरुणीवर माथेफिरूनं बलात्कार करुन तिचा खून केल्यानं देशभर खळबळ उडाली. या प्रकरणी संजय रॉय याला न्यायालयानं शनिवारी दोषी घोषित केलं. न्यायालयानं आज संजय रॉय याला शिक्षा ठोठावली आहे. संजय रॉय याला न्यायालयानं जन्मठेप ठोठावली आहे. शिक्षा ठोठावताना न्यायालयानं संजय रॉय याला त्याची इच्छा विचारली असता, त्यानं आपल्याला या प्रकरणात गोवण्यात आल्याचं स्पष्ट केलं. संजय रॉय याला जन्मठेप : कोलकाता इथल्या वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील शिकाऊ डॉक्टर तरुणीवर माथेफिरू संजय राय यानंच बलात्कार केल्याचं न्यायालयात



सिद्ध झालं आहे. न्यायालयानं संजय रॉय याला दोषी ठरवत त्याला जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. याबाबत माहिती देताना वकील रहमान यांनी सांगितलं की, सियालदाह इथल्या सत्र न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीशांनी संजय रॉय याला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयानं राज्य सरकारला पीडितेच्या कुटुंबाला १७ लाख रुपये भरपाई देण्याचे निर्देश दिले. सीबीआयनं या प्रकरणातील दोषीला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली. मात्र न्यायाधीशांनी हे दुर्मिळ प्रकरण नाही, म्हणून फाशीची शिक्षा ठोठावण्यात आलेली नाही असं स्पष्ट केलं.

# इयत्ता पाचवीमध्ये शिकत असणारी वैभवी सुजीत देवरुखकर या विद्यार्थीनीची इस्त्रो या ठिकाणी अभ्यास दौऱ्यासाठी निवड

रत्नागिरी (सुचित शिंदे) - रत्नागिरी जिल्हा परिषदेच्यावतीने घेण्यात येणाऱ्या 'जाणू विज्ञान ; अनुभवू विज्ञान' या उपक्रमांतर्गत सन २०२४/२५ या शैक्षणिक वर्षांमध्ये नासा व इस्त्रो निवड परीक्षेमध्ये खेड तालुक्यातील जि. प. पू. प्रा. शाळा पोयनार पाटीलवाडी या शाळेतील इयत्ता पाचवीमध्ये शिकत असणारी कुमारी वैभवी सुजीत देवरुखकर या विद्यार्थीनीची इस्त्रो (बेंगलोर आणि श्रीहरी कोटा अंतराळ संशोधन संस्था) या ठिकाणी अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. ही बाब जि. प. पू. प्रा. शाळा पोयनार पाटीलवाडी या शाळेसाठी व पोयनार गावासाठी अभिमानाची ठरली आहे. कुमारी वैभवी सुजित देवरुखकर हिचे तिच्या या शैक्षणिक यशाबद्दल



सर्वच स्तरातून कौतुक होत आहे. यासाठी तिला वर्गशिक्षक श्री. संजय पंढरीनाथ जाधव सर यांचे मोलाचे मार्गदर्शन झाले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नम्रता निनाद दामले मॅडम यांची प्रेरणा मिळाली. तसेच पदवीधर शिक्षण सेवक श्री. तुषार देसले सर यांनीही मार्गदर्शन केले. शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्षा सौ. अनिशा शिगवण मॅडम व सर्व सदस्यांनी कुमारी वैभवी चे अभिनंदन केले व भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच पोयनार गावचे सरपंच श्री. संदेश मोहिते, उपसरपंच श्री. राजेंद्र विचारे, ग्रामसेवक श्री. नितेश आंबडसकर, सदस्य तसेच श्री दत्त मित्र मंडळ पाटील वाडी यांनीही कुमारी वैभवी चे अभिनंदन केले... या यशाबद्दल खेड तालुक्याचे गट शिक्षणाधिकारी श्री. विजय बाईत, शिक्षण विस्तार अधिकारी (प्रभाग खवटी) श्री. संतोष भोसले आणि धामणी केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. भाऊसाहेब दराणे यांनी कुमारी वैभवी चे आणि सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे व शाळेच्या मुख्याध्यापिका यांचे अभिनंदन केले.




महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघ व सेन्ट्रल रेल्वे कमिटी सदस्य ZRUCC Member अभिजीत धुरत व आरपीआय(आर.के )चे अध्यक्ष मा राजाराम खरात साहेब महासंघाचे रायगड जिल्हाध्यक्ष सुर्यकांत वाघमारे, यानी आज २० जानेवारी २० २५ रोजी स्टेशन मॅनेजर, के.एस अग्रवाल याना भेटून घेऊन रेल्वे प्रवाश्या च्या समस्या बाबत चर्चा केली, तसेच नवीन पनवेल कर्जत लाईन लवकर सुरु होणार असल्याचे सांगितले, यावेळी डिप्टी एसएम राजेश तिवारी तसेच मोठ्या संख्येने रेल्वे प्रवासी उपस्थित होते.

# मुंबई मॅरेथॉनमध्ये २७ जण रुग्णालयात दाखल, एका रुग्णावर अँजिओप्लास्टी

● मुंबई, विशाल कारंडे :

रविवारी झालेल्या मुंबई मॅरेथॉनमध्ये धावताना २७ जणांना रुग्णालयात दाखल करण्याची वेळ आली तर जवळपास २०१८ स्पर्धकांना वैद्यकीय मदतीची गरज भासली. त्यात पायात गोळे येणे, निर्जलीकरण आणि लहानसहान दुखापतींचा समावेश आहे. रुग्णालयात दाखल रुग्णांपैकी एका रुग्णाला हृदयाचा त्रास सुरू झाल्याने त्याच्यावर बॉम्बे रुग्णालयात तातडीने अँजिओप्लास्टी करण्यात आली. प्रत्येक वर्षी जानेवारीच्या तिसऱ्या रविवारी मुंबई मॅरेथॉनचे आयोजन केले जाते. यंदाच्या २० व्या मुंबई मॅरेथॉनमध्ये मुंबईसह देशविदेशातील नागरिक, सेलिब्रेटी, दिव्यांग, तरुणाई व वृद्ध व्यक्ती मोठ्या आनंदाने सहभागी झाले होते. मुंबई मॅरेथॉनमध्ये सहभागी झालेल्या धावपटूंना योग्यवेळी वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी एशियन




हार्ट इन्स्टिट्यूटतर्फे डॉक्टर, परिचारिका, फिजियोथेरेपिस्ट आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांसह ६०० स्वयंसेवकांची तुकडी सज्ज ठेवण्यात आली होती. मुंबई मॅरेथॉनमध्ये यंदा जवळपास ६२ हजार धावपटू सहभागी झाले होते. त्यातील २०१८ जणांना वैद्यकीय मदतीची गरज भासली, तर २७ जणांना रुग्णालयात दाखल करावे लागले.

वैद्यकीय मदतीची गरज भासलेल्या धावपटूंपैकी ५५ टक्के धावपटूंना पायात गोळे येणे, निर्जलीकरण आणि लहान दुखापती झाल्या. तसेच रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या २७ जणांमध्ये हृदयविकाराचा झटका, रक्तस्राव, तीव्र निर्जलीकरण, अस्थिभंग झाल्याची माहिती एशियन हार्ट इन्स्टिट्यूटमधील हृदयविकार तज्ज्ञ व वैद्यकीय संचालक डॉ. संतोष कुमार डोरा यांनी सांगितले. बॉम्बे रुग्णालयात १५, लीलावती रुग्णालयात ५, पोद्दार रुग्णालयात २, जसलोक रुग्णालयात ३ आणि जी.टी. रुग्णालय व सैफी रुग्णालयात प्रत्येकी एका रुग्णाला दाखल केले. त्यापैकी १६ जणांवर उपचार करून त्यांना घरी सोडण्यात आले तर उर्वरित सर्व रुग्णांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉ. संतोष कुमार डोरा यांनी सांगितले.

बॉम्बे रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णांपैकी दोघांना तीव्र निर्जलीकरणाचा त्रास झाल्याने ते खाली पडून जखमी झाले. त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार सुरू असून त्यांना जीवरक्षक प्रणाली लावण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मॅरेथॉनमध्ये धावताना अचानक छातीत दुखू लागल्याने एका ४८ वर्षीय व्यक्तीला बॉम्बे रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याची तपासणी केली असता तातडीने अँजिओप्लास्टी करण्याची आवश्यकता असल्याचे लक्षात आले. त्यामुळे डॉक्टरांनी त्यांच्यावर अँजिओप्लास्टी केल्याची माहिती बॉम्बे रुग्णालय प्रशासनाकडून देण्यात आली.

जी. टी. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलेल्या रुग्णाला निर्जलीकरणाचा त्रास झाला होता. या रुग्णावर उपचार करण्यात आले असून त्याची प्रकृती स्थिर असल्याची माहिती जी.टी. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. जितेंद्र संकपाळ यांनी दिली.

# नंदुरबारमध्ये पोलिसांवर दगडफेकप्रकरणी १८ जण ताब्यात

● नाशिक, सचिन कदम :

नंदुरबार शहरात रविवारी किरकोळ अपघातामुळे निर्माण झालेल्या तणावाचा फायदा घेत एका गटातील काही जणांनी पोलिसांवर दगडफेक केली. या प्रकरणी पोलिसांनी १८ जणांना ताब्यात घेतले असून त्यातील सात जण हे अल्पवयीन आहेत.

नंदुरबार शहरातील बिस्मिल्ला चौकात रविवारी मद्यप्राशन केलेल्या रिक्षाचालकाने दुसऱ्या गटातील व्यक्तीला धडक दिली. या अपघातामुळे शहरात तणाव निर्माण झाला होता. त्यानंतर पुन्हा दोन गटांमध्ये किरकोळ घटना घडल्या. पोलिसांनी सतर्कता म्हणून चोख बंदोबस्त तैनात केला होता. या तीनही घटनांप्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंदवत धरपकड सुरु केली होती. रात्री १० वाजेच्या सुमारास त्रिकोणी इमारत, हलवाई मोहल्ला आणि चिराग गल्ली परिसरातील काही समाजकंटकांनी अंधाराचा फायदा घेत दगडफेड सुरु



## सात संशयित अल्पवयीन

नंदुरबारमधील दगडफेकप्रकरणी आतापर्यंत १८ जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यापैकी सात जण अल्पवयीन आहेत. ज्यांनी कायदा हातात घेवून शहराची शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला, त्यांना सोडले जाणार नाही. शहरात शांतता आहे. कोणीही अफवेवर विश्वास ठेवू नये. कुठलीही अनुचित घटना दिसून आल्यास पोलिसांना योग्य प्रतिसाद द्यावा.

– श्रवणदत्त एस. (पोलीस अधीक्षक, नंदुरबार)

केली. बंदोबस्तासाठी उपस्थित पोलिसांवर अचानक झालेल्या दगडफेकीमुळे काही काळ तणाव निर्माण झाला होता. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिसांची अतिरिक्त कुमक दाखल झाली. त्यांनी तत्काळ कारवाई सुरु केली. अश्रुधुराच्या १० ते १२ नळकांड्या फोडत पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली. याप्रकरणी पोलिसांनी १८ जणांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. दगडफेकीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी एका पोलीस वाहनाचे नुकसान झाले असून बंदोबस्तावरील काही अधिकारी, कर्मचारी किरकोळ जखमी झाले आहेत.